सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १५५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# महाराष्ट्रात 19 सप्टेंबरला पावसाचा जोर वाढणार? 13 जिल्ह्यांना यलो अलर्ट; वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज



**मुंबई :** महाराष्ट्रात १९ सप्टेंबर रोजी काही भागांत पावसाचा जोर राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १३ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला असून, या भागांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दुसरीकडे काही जिल्ह्यांना कोणताही इशारा नसला तरी हलक्या ते मध्यम सरींची शक्यता कायम आहे. मात्र, विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यांत हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याचा अंदाज आहे.

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. येथे काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी वारे आणि हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. पालघर, ठाणे आणि मुंबई या भागांत अलर्ट नसला तरी काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

**उत्तर महाराष्ट्रात वादळी पावसाचा अंदाज :** धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता असून, काही भागांत यलो अलर्ट लागू आहे. वादळी वातावरणासह ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

**पुणे-साताऱ्यातही यलो अलर्ट :** पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि सातारा जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांत हलका ते मध्यम पाऊस, तसेच काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर येथे अलर्ट नसला तरी पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडू शकतात.

**मराठवाड्यात चार जिल्ह्यांना अलर्ट :** छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, नांदेड आणि लातूर या चार जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि पावसाचा अंदाज आहे. जालना, परभणी, बीड आणि धाराशिव येथे अलर्ट नसला तरी काही ठिकाणी पाऊस होऊ शकतो.

**विदर्भात हवामान कोरडे राहणार :** अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या ११ जिल्ह्यांत १९ सप्टेंबरला हवामान मुख्यतः कोरडे राहण्याचा अंदाज आहे. या भागांत मोठ्या पावसाची शक्यता नाही.

**नागरिक आणि शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी :** यलो अलर्ट असलेल्या भागांत वादळी वातावरणाच्या वेळी नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. विजांचा कडकडाट सुरू असताना झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबणे टाळावे. शेतकऱ्यांनीही स्थानिक हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शेतीची कामे आणि फवारणीचे नियोजन करावे.

# ठाण्यात भीषण दुर्घटना! 5 झोपड्यांना आग लागून सिलिंडरचा स्फोट; सुदैवाने मोठा अनर्थ टळला!



**ठाणे :** ठाण्यातील कळवा (पश्चिम) भागात शुक्रवारी सकाळी आगीची एक मोठी दुर्घटना घडली. खारेगाव पुलाजवळ आणि सहयोग सोसायटीच्या मागील बाजूस असलेल्या पाच तात्पुरत्या झोपड्यांना अचानक भीषण आग लागली. या आगीच्या भडक्यात एका झोपडीतील लहान एलपीजी (LPG) सिलिंडरचा भीषण स्फोट झाल्याने परिसरात काही काळ घबराट पसरली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र पाचही घरे आणि त्यातील संपूर्ण सामान जळून खाक झाले आहे.


**माहिती मिळताच आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी**

**सकाळी** ९:२३ वाजता ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला या आगीबाबत फोनवरून माहिती मिळाली. घटनेचे गांभीर्य ओळखून अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाचे जवान तातडीने मदतीसाठी घटनास्थळाकडे रवाना झाले.

**झोपड्यांना कुलूप असल्याने टळला मोठा अनर्थ**

अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले तेव्हा आग लागलेल्या पाचही झोपड्या बाहेरून बंद होत्या. घरात कोणीही व्यक्ती हजर नसल्यामुळे जीवितहानी किंवा कोणीही जखमी होण्याचा मोठा धोका टळला. परंतु, आगीच्या तीव्रतेमुळे घरातील लहान सिलिंडरचा मोठा स्फोट झाला, ज्यामुळे आगीने अधिक रौद्ररूप धारण केले.

# सहा दशकांचं नेतृत्व संपलं! 'वॉरेन बफे' अध्यक्षपदावरून पायउतार; बर्कशायर हॅथवेची सूत्रं आता मुलाकडे सुपूर्द



**नवी दिल्ली :** जगप्रसिद्ध गुंतवणूकदार वॉरेन बफे यांनी तब्बल सहा दशकांहून अधिक काळ नेतृत्व केलेल्या बर्कशायर हॅथवेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आता सोडली आहे. कंपनीने १८ सप्टेंबर २०२६ रोजी याबाबत अधिकृत घोषणा केली. ९६ वर्षीय बफे यांना यापुढे 'Chairman Emeritus' अर्थात मानद अध्यक्षाची भूमिका देण्यात आली असून, ते संचालक मंडळावर कायम राहणार आहेत. दरम्यान, दीर्घकाळापासून आखलेल्या उत्तराधिकारी नियोजनानुसार त्यांचे पुत्र हॉवर्ड जी. बफे यांच्याकडे अध्यक्षपदाची सूत्रे सोपवण्यात आली आहेत.

**बफे यांची नवी भूमिका काय? :** Chairman Emeritus म्हणून बफे कंपनीच्या बोर्डावर कायम राहतील आणि त्यांच्या अनुभवाचा, निर्णयक्षमतेचा व दृष्टिकोनाचा बर्कशायरला यापुढेही लाभ मिळणार आहे. कंपनीच्या दीर्घकालीन उत्तराधिकारी नियोजनानुसार हा बदल करण्यात आला आहे. सुसान डेकर प्रमुख स्वतंत्र संचालक म्हणून आपल्या भूमिकेत कायम राहतील.

**हॉवर्ड बफे यांच्याकडे अध्यक्षपद :** वॉरेन बफे यांचे ७१ वर्षीय पुत्र हॉवर्ड बफे १९९३ पासून बर्कशायर हॅथवेच्या संचालक मंडळावर आहेत. दीर्घकाळापासून आखलेल्या उत्तराधिकार योजना (succession plan) नुसार आता त्यांच्याकडे बोर्डाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मात्र कंपनीचे दैनंदिन कामकाज CEO ग्रेग एबल यांच्या नेतृत्वाखाली सुरू राहणार आहे.

**ग्रेग एबल यांनी केलं कौतुक**

बर्कशायर हॅथवेचे CEO ग्रेग एबल यांनी बफे यांच्या योगदानाचे कौतुक करताना, त्यांनी उभारलेली कंपनीची संस्कृती आणि मूल्ये यापुढेही बर्कशायरच्या केंद्रस्थानी राहतील, असं म्हटलं. हॉवर्ड बफे या मूल्यांचं जतन करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**१९६५ मध्ये घेतली होती बर्कशायरची सूत्रं :** वॉरेन बफे यांनी १९६५ मध्ये बर्कशायर हॅथवेची सूत्रं हाती घेतली, तेव्हा कंपनी प्रामुख्याने संघर्ष करणारी वस्त्रोद्योग कंपनी होती. पुढील सहा दशकांत त्यांच्या नेतृत्वाखाली तिचं रूपांतर विमा, ऊर्जा, रेल्वे, उत्पादन, सेवा आणि किरकोळ व्यवसाय असलेल्या १ ट्रिलियन डॉलरहून अधिक मूल्याच्या मोठ्या उद्योगसमूहात झालं.

**CEO पदही आधीच सोडलं :** अध्यक्षपद सोडण्यापूर्वीच बफे यांनी बर्कशायरच्या CEO पदाची जबाबदारी ग्रेग एबल यांच्याकडे सोपवली होती. आता अध्यक्षपदाची जबाबदारीही हॉवर्ड बफे यांच्याकडे गेल्याने कंपनीच्या दीर्घकाळ नियोजित नेतृत्व हस्तांतरणाचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे.

# 'मी गावी आलो, दिल्लीत किंवा लंडनला गेलो तरी विरोधकांना पोटदुखीच': उपमुख्यमंत्री शिंदे



**सातारा :** गणेशोत्सवाच्या निमित्ताने आपल्या 'दरे' या मूळ गावी पोहोचलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (Eknath Shinde) यांनी राजकीय विरोधकांवर जोरदार निशाणा साधला आहे. मी गावी आलो, दिल्लीला गेलो किंवा लंडनच्या दौऱ्यावर गेलो, तरी विरोधकांच्या पोटात उगाचच दुखायला लागते. त्यामुळे आता या राजकीय 'पोटदुखी'वर औषध म्हणून एखादे झाड शोधावे लागेल किंवा त्यांना थेट 'जमाल गोटा'च द्यावा लागेल, अशा शब्दांत त्यांनी फिरकी घेतली. टीका टिप्पणीला आरोपांनी नव्हे, तर प्रत्यक्ष काम करूनच उत्तर देणे योग्य ठरेल, कारण मी केवळ कामाचा माणूस आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मी कोणत्याही कारणाने नाराज नसून केवळ सणाच्या निमित्ताने गावी आलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जागतिक बांबू लागवड दिनाचे औचित्य साधून शिंदेंनी आपल्या शेतात बांबूची लागवड केली. याप्रसंगी बोलताना त्यांनी बांबूच्या वाढत्या महत्त्वाची माहिती दिली. बांबूचा उपयोग आता केवळ साध्या वस्तूंसाठी उरलेला नसून त्यापासून इथेनॉल निर्मिती, विमानतळांचे बांधकाम आणि इतर अनेक उपयुक्त वस्तू बनविल्या जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी बांबूच्या लागवडीवर विशेष लक्ष केंद्रित केले पाहिजे, असा सल्ला त्यांनी दिला. शिंदेंनी आपल्या शेतात कृषी क्षेत्रातील नवनवीन प्रयोग केले असून, त्यात सफरचंद आणि ब्ल्यू बेरीच्या यशस्वी उत्पादनानंतर आता कापूर आणि हिंगाच्या रोपांची नवीन लागवड केली आहे. विशेष म्हणजे, आजवर परदेशातून आयात करावी लागणारी ब्ल्यू बेरी आता महाराष्ट्राच्या मातीत पिकवता येऊ शकते, हे त्यांनी आपल्या प्रयोगातून सिद्ध करून दाखवले आहे.

राज्यातील शेती आणि शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर बोलताना त्यांनी सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले. ज्या भागात पावसाच्या ओढीमुळे किंवा दुष्काळसदृश परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाले आहे आणि पिके करपून गेली आहेत, तिथे तातडीने पंचनामे करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. संबंधित जिल्ह्यांचे पालकमंत्री सध्या या बाधित क्षेत्रांची पाहणी करत असून, आपण स्वतः लवकरच या दुष्काळी भागांचा दौरा करून परिस्थितीचा आढावा घेणार असल्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

# एशियन गेम्समध्ये भारताचा डंका! मनू भाकर आणि तजिंदरपाल सिंग तूर भूषवणार ध्वजधारकाचा मान

**नवी दिल्ली :** जपानमधील नागोया येथे होणाऱ्या 'आशियाई खेळ २०२६' च्या (Asian Games 2026) भव्य उद्घाटन सोहळ्यासाठी भारताचे ध्वजधारक म्हणून डबल ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर (Manu Bhakar) आणि अनुभवी गोळाफेकपटू (शॉटपुटर) तजिंदरपाल सिंग तूर (Tajinderpal Singh Toor) यांची निवड करण्यात आली आहे. नागोया येथील प्रसिद्ध 'पालोमा मिझुहो स्टेडियम'वर शनिवारी दुपारी २:३० ते ४:३० (भारतीय वेळेनुसार) या कालावधीत हा दिमाखदार सोहळा पार पडणार आहे. येत्या ४ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे ५०० हून अधिक खेळाडू तब्बल ३७ विविध खेळांमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये एकाच वेळी दोन पदके जिंकून भारतीय क्रीडा जगतात नवा इतिहास रचणारी मनू भाकर भारतीय पथकाचे नेतृत्व करेल. तिने १० मीटर एअर पिस्तूल वैयक्तिक तसेच मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदके पटकावली होती. याशिवाय हँगझोऊ आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या २५ मीटर पिस्तूल संघातही तिचा सहभाग होता. दुसरीकडे, तजिंदरपाल सिंग तूर याने पुरुष गोळाफेक प्रकारात सलग दोन आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला आहे. यावेळी सलग तिसऱ्यांदा सुवर्ण पटकावून आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा त्याचा प्रयत्न असेल. हँगझोऊ येथे झालेल्या गेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने २८ सुवर्णपदकांसह तब्बल १०७ पदके जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली होती. या वेळी नागोयामध्ये हा विक्रम मोडून पदकांची संख्या आणखी वाढवण्याचा निर्धार भारतीय ॲथलीट्सने केला आहे. विशेष म्हणजे भारतीय पुरुष व महिला क्रिकेट संघ, कबड्डी संघ आणि पुरुष हॉकी संघ या स्पर्धेत गतविजेते (चॅम्पियन) म्हणून मैदानात उतरणार आहेत. या क्रीडा महोत्सवात आशियातील ४५ देशांमधील हजारो खेळाडू ४३ खेळांमध्ये आमनेसामने असतील.

# पाकिस्तान हादरले ! नमाजावेळी मशिदीजवळ भीषण स्फोट; 16 जणांचा मृत्यू



**नवी दिल्ली :** पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातील कोहाट जिल्ह्यात शुक्रवारच्या नमाजावेळी भीषण स्फोट झाला. जुन्या पोलीस लाइन्सजवळील मशिदीजवळ झालेल्या या स्फोटात किमान 16 जणांचा मृत्यू, तर 50 हून अधिक जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. शुक्रवारी, 18 सप्टेंबर रोजी नमाजासाठी मोठ्या संख्येने नागरिक मशिदीत जमले होते. त्याचवेळी पोलीस लाइन्स परिसरात जोरदार स्फोट झाला. स्फोटानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. जखमींना तातडीने कोहाट जिल्हा मुख्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले. स्फोटाची तीव्रता मोठी असल्याने मशिदीच्या बाहेरील भागाचे मोठे नुकसान झाले. एका भिंतीचा भाग कोसळला असून स्फोटामुळे घटनास्थळी मोठा खड्डाही पडला. आसपासच्या इमारतींचेही नुकसान झाल्याची माहिती आहे. स्फोटानंतर बचाव पथके आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले. जखमींना रुग्णालयात हलवण्यात आले असून कोहाटच्या जिल्हा रुग्णालयात आपत्कालीन परिस्थिती जाहीर करण्यात आली.

ताज्या वृत्तांनुसार, मृतांमध्ये नागरिकांसोबत पोलीस कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. काही अहवालांनुसार या हल्ल्यात पाच पोलीस कर्मचारी आणि 11 नागरिकांचा मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, स्फोट हा स्फोटकांनी भरलेल्या वाहनाशी संबंधित असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. स्फोटानंतर परिसरात गोळीबाराचीही माहिती समोर आली असून सुरक्षा दलांनी परिसराला घेराव घातला आहे.

**हल्ल्याची जबाबदारी अद्याप कुणी स्वीकारली नाही**

या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने स्वीकारलेली नाही. स्फोटामागील नेमके कारण, हल्लेखोर आणि त्यामागील सूत्रधारांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा यंत्रणांकडून तपास सुरू आहे. घटनेनंतर परिसरात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले असून कोहाट-हांगू मार्गावरील वाहतूकही बंद करण्यात आल्याची माहिती आहे. हा एक विकसित होत असलेला प्रकार असून मृतांचा आणि जखमींचा आकडा बदलू शकतो.







# 2006 च्या बहुचर्चित निठारी हत्याकांडातील मुख्य आरोपी सुरिंदर कोळीची आत्महत्या; हरिद्वारमधील चहाच्या टपरीवर गळफास

**हरिद्वार :** २००६ मधील नोएडा येथील बहुचर्चित आणि थरारक निठारी नरसंहार प्रकरणातील मुख्य आरोपी सुरिंदर कोळी याने शुक्रवारी (१८ सप्टेंबर २०२६) उत्तराखंडमधील हरिद्वार येथे गळफास लावून आत्महत्या केली. सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्व प्रकरणांतून निर्दोष मुक्तता केल्यानंतर कोळी जवळपास १९ वर्षांनंतर तुरुंगाबाहेर आला होता. गेल्या काही दिवसांपासून तो हरिद्वारमधील एका चहाच्या टपरीवर काम करत होता, त्याच ठिकाणी त्याचा मृतदेह आढळून आला.

माहितीनुसार, हरिद्वारमधील भूपतवाला भागातील सप्त सरोवर रस्त्यावर असलेल्या लालमाता मंदिरासमोरील एका चहाच्या टपरीवर सुरिंदर कोळीचा मृतदेह दोरीच्या साहाय्याने लटकलेल्या अवस्थेत सापडला. या घटनेची माहिती मिळताच सप्तर्षी चौकीच्या पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाजवळ सापडलेल्या [Aadhaar Redacted] वरून त्याची ओळख पटवण्यात आली, ज्यानंतर पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांना याबद्दल माहिती दिली.

**आत्महत्येचे कारण अस्पष्ट**

सुरिंदर कोळी याने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी सखोल तपास सुरू केला आहे. प्राथमिक माहितीनुसार कौटुंबिक वादातून ही घटना घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे, मात्र आत्महत्येचे नेमके कारण अजून स्पष्ट झालेले नाही. पोलीस या प्रकरणातील सर्व संभाव्य कोनांचा विचार करून तपास करत आहेत.


**सर्वोच्च न्यायालयाकडून अंतिम प्रकरणात निर्दोष मुक्तता**

निठारी हत्याकांडातील विविध खटल्यांमुळे सुरिंदर कोळीला तब्बल १९ वर्षे तुरुंगात राहावे लागले होते. ऑक्टोबर २०२३ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने १२ प्रकरणांमध्ये त्याची निर्दोष मुक्तता केली होती. तपासातील गंभीर त्रुटी आणि पुराव्यांवरील संशय लक्षात घेऊन न्यायालयाने हा निर्णय दिला होता. जुलै २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेही या मुक्ततेविरोधातील याचिका फेटाळून लावल्या होत्या. तरीही, रिम्पा हलदर या अल्पवयीन मुलीवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणात शिक्षा झाल्यामुळे कोळी तुरुंगातच होता. दया याचिकेवर निर्णय होण्यास झालेला विलंब विचारात घेऊन २०१५ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने त्याची फाशीची शिक्षा जन्मठेपेत बदलली होती. त्यानंतर, नोव्हेंबर २०२५ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश बी. आर. गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या खंडपीठाने कोळीची पुनर्विलोकन याचिका मंजूर करत त्याची अंतिम खटल्यातूनही निर्दोष मुक्तता केली. पोलिसांनी घेतलेला जबाब आणि सादर केलेले पुरावे शिक्षेसाठी पुरेसे नाहीत, असा निष्कर्ष काढत जर तो इतर कोणत्याही गुन्ह्यात हवा नसेल तर त्याची तात्काळ सुटका करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. तपासातील त्रुटींवर बोट ठेवताना सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की, कोळीला दीर्घकाळ पोलीस कोठडीत ठेवणे, त्याचा कबुलीजबाब नोंदवण्याची पद्धत आणि गुन्ह्याशी त्याचा थेट संबंध जोडणाऱ्या पुराव्यांचा अभाव या गंभीर बाबी आहेत. केवळ संशयाच्या आधारावर कोणालाही दोषी ठरवता येत नाही, तर पुराव्याची साखळी सिद्ध होणे आवश्यक असते, असे न्यायालयाने स्पष्ट केले होते.



## सुखकर्ता दुःखहर्ता गणेश

श्री समर्थ रामदास स्वामींनी केलेली गणेशाची आरती आपण नेहमीच ऐकतो. गणेशोत्सवात घरोघरी ही आरती आपल्या कानावर सतत पडत असते. गणपती म्हणजे विश्वव्यापी शुद्ध जाणीव होय. हिलाच ईश्वर असेही म्हणतात. माणसाच्या मनात अर्थ समजण्याची पात्रता वास करते, हे गणपतीचे अधिष्ठान असून, तेच माणसाला ज्ञानाकडे खेचते. गणपती हा ज्ञान स्वरूप आहे म्हणून अर्थ आकलन होण्यास अथवा अज्ञान नाहीसे होण्यास त्याची कृपा आवश्यक असते. ज्ञानसाधना चालू असता मध्येच उद्‌भवणारी विघ्ने ज्ञानस्वरूप गणेशाच्या कृपेने नाश पावतात, म्हणून तो विघ्नहर्ता आहे.



श्री गणेश म्हणजे विवेकबुद्धी. मनुष्याला सुख-दुःख हे देह, गुण, काळ अवस्थांमुळेच प्राप्त होतात. मनुष्य सुखासाठी विषयांच्या मागे धावतो. स्पर्धा, द्वेष, मोह, मत्सर, राग, लोभ, मद या तमोगुणामुळे स्वतःचा नाश ओढवून घेतो. रजगुणामुळे तो मी आणि माझे या स्वार्थीपणात रमतो. तर जास्त सत्वगुणांनीही स्वतःचे नुकसान करून घेतो, कारण अतिरिक्त सत्त्व गुण हा सुद्धा दुर्गुणच आहे तसेच अविवेकाने अनेक विघ्नेसुद्धा प्राप्त करतो. सारासार विवेकबुद्धीने सर्वांचा विचार केला तर आपण परमात्मस्वरूपच आहे, ही खात्री त्याला पटून त्याची देहबुद्धी नाहीशी होते. त्रिगुणा पलीकडे जाण्याचे प्रयत्न होतात. षडरिपूंवर मात करून त्यांच्याही पलीकडे तो जातो. अज्ञान नाहीसे होते आणि मनुष्य शांत होतो. त्याला शाश्वत सुख आनंद मिळतो.

अथर्वशीर्षातही श्री गणेश हा देह, काळ आणि गुण या अवस्थांतीत म्हणजे अवस्थांच्या पलीकडे आहे म्हणूनच गणेश आनंदरूप, परमात्मस्वरूप आहे. परमात्मस्वरूप हे सत् चित् आनंद स्वरूप असते. गणेश आनंद रूप असल्याने, तो सुखकर्ता आणि आनंदाचा सागरच असल्याने त्याच्याजवळ दुःख स्पर्श करीत नाही. अशा आनंदमय गजाननावर श्रद्धा असलेल्या भक्तांच्या भवसागरातील सर्व संकटांचा नाश होतो. काळजी करणारा, द्वेष, मत्सर करणारा, जुन्या आठवणींना वेळोवेळी उजाळा देणारा, कधी सुखी शांत असत नाही. त्यामुळे मनुष्याने सर्व दुर्गुणांना विवेकाने दूर ठेवावे म्हणजे त्रिगुणातीत होऊन श्री गणेशासारखेच होण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे मनुष्यालाही शांतता लाभून शाश्वत सुख लाभेल.

डॉ. प्रज्ञा प्रकाश पुसदकर
९४२३७३३६३०

श्री गणेश हा सर्वव्यापी आणि अद्वितीय म्हणजे शाश्वत असे एकमेव चैतन्य आहे. हे एकमेव चैतन्यतत्त्व अंशरूपाने सर्वत्र भरले आहे, हे मनुष्याने जाणले असता द्वेष, भांडण, मत्सर हेवेदावे नाहीसे होऊन मनुष्याची दृष्टी प्रेममय होते म्हणजेच विघ्नाची वार्तासुद्धा नुरते आणि प्रेम पुरवीते कारण त्याची कृपा झाली की प्रेमाशिवाय दुसरे देण्यासारखे काहीच राहत नाही.

एका आरतीत समर्थ म्हणतात, 'तुझीया स्मरणे जाती पातके पार्वती नंदना' याचा अर्थ, जो गणेशाचे स्मरण करतो म्हणजे नाम घेतो, त्याचे चिंतन करतो, त्याची पातके नष्ट होतात. बुद्धीने प्रत्येक गोष्टीचा विचार केला की ज्ञान होऊन संशय दूर होतात आणि प्रत्येक गोष्टीचे यथार्थ ज्ञान होऊन मार्ग कळतो. त्या मार्गाने गेल्यास अंतिम आनंदच प्राप्त होतो. समर्थ दासबोधात गणेशाचे वर्णन करतात.

**तुझिये कृपेचेनि बळे।**
**वितुळती भ्रांतिची पडळे।**
**आणि विश्व भक्षक काळे।**
**दास्यत्व कीजे।।**

गणेशाच्या कृपेच्या सामर्थ्याने भ्रम आणि अज्ञान यांचे आवरण विरून जाते आणि सारे विश्व गिळून टाकणारा काळ आपला गुलाम बनतो.

**येता कृपेची निज उडी।**
**विघ्ने कापती बापुडी।**
**होऊन जाती देश धडी। नाममात्रे।।**

गणेशाची एकदा का भक्तावर कृपा झाली की बिचारी संकटेदेखील भयाने थरथर कापू लागतात. इतकेच नव्हे तर ती कुठल्या कुठे नाहीशी होऊन जातात. यासाठी गजाननाला विघ्नहर असे म्हणतात. अशा या गणेशाची उपासना केल्यास त्याचे फळ चांगले मिळते.

**ध्यान गणेशाचे वर्णिता।**
**मतीप्रकाश होये भ्रांता।।**
**गुणानुवाद श्रवणकरिता।**
**वोळे सरस्वती।।**

गणेशाच्या रूपाचे चिंतन केले तर अज्ञानाने भ्रमित झालेल्या माणसाच्या बुद्धीत ज्ञानाचा प्रकाश पडतो. त्याच्या गुणांचे वर्णन ऐकले तर सरस्वती प्रसन्न होते. ज्याची बुद्धी मंद असेल त्याने गणपतीची उपासना करावी. त्याचे चिंतन करावे जी माणसे अवलक्षणी व मूर्ख असतात किंवा जी अतिहीन असतात ती माणसे गणपतीच्या चिंतनाने हुशार बनतात आणि सर्व विषयात पारंगत होतात. असा हा गणेश मोठा समर्थ आहे सर्व इच्छा पूर्ण करणारा आहे. साधकाला अनुभवाचा स्वार्थ साधून देणारा आहे. म्हणूनच म्हटले जाते, 'गजानना श्री गणराया आधी वंदू तुज मोरया.'

## सोन्या-मोत्यांच्या पावलांनी गौराई आल्या...

गणपती बाप्पांच्या आगमनानंतर अवघ्या महाराष्ट्राला ज्या एका सणाची आतुरता लागते, तो म्हणजे गौरी सण! गणरायाच्या आगमनाने घराघरात मंगलमय वातावरण निर्माण झालेलं असतं आणि त्यातच गौरींच्या आगमनाने त्या आनंदाला जणू मायेची, समृद्धीची आणि स्त्रीशक्तीची एक सुंदर किनार लाभते. 'भाव तिथे देव' या उक्तीप्रमाणे आपल्या मनात भाव, भक्ती, श्रद्धा असेल तर आपल्याला प्रत्येक प्राणिमात्रात तसेच सजीव आणि निर्जीव वस्तुतही देवत्वाची अनुभूती येते. ही अनुभूतीच आपल्याला भक्तिमार्गावर वाटचाल करण्यास सामर्थ्य देते आणि श्रद्धेचे बळही देते. भाद्रपद महिन्यातील गौरी-गणपतीचे हे दिवसही असेच अनुभूतींचे आहेत.

भाद्रपद शुद्ध पक्षात अनुराधा नक्षत्रावर गौरीचे सोन्या-मोत्यांच्या पावलांनी आगमन होते, तर जेष्ठ नक्षत्रावर गौरींचं पूजन व मूळ नक्षत्रावर विसर्जन असा गौरी पूजनाचा क्रम असतो. 'गौरी' शब्दाचा अर्थ ज्येष्ठा गौरी अथवा 'महालक्ष्मी' असा आहे. गणेश चतुर्थीनंतर या गौरी येतात. 'जेष्ठा गौरी म्हणजे माहेरी आलेली माहेरवाशीणच!' जेष्ठा गौरी हे पार्वतीचेच रूप. गणेशाच्या आगमनानंतर गणपतीची आई पार्वती म्हणजेच गौरी आपल्या पुत्राचा भूतलावर चाललेला उत्सव पाहायला आणि त्याला भेटायला येते. गौरीचा 'महालक्ष्मी' असाही उल्लेख केला जातो. स्त्रिया आपल्या सौभाग्यासाठी आपापल्या कुळातील प्रथेप्रमाणे गौरीपूजन करतात. काही घरी धातूच्या, मातीच्या मूर्तींची, मुखवट्याची, तर काही ठिकाणी पाणवठ्यावरून पाच किंवा सात खडे आणून त्यांची गौरी स्वरूपात पूजा केली जाते. माहेरवाशिणीकडून किंवा घरातील लेकीसुनांकडून ही गौर 'गौर आली गंगा आली, गणपतीची आई आली' असे म्हणत वाजतगाजत घरात आणली जाते. गौरी-गणपतीची भेट होते.

संजय करगुटकर
९८९०७५९००५

पहिल्या दिवशी भाकरी, पालेभाजी, ज्वारीच्या कण्या असा गौरीला नैवेद्य दाखवतात. तर अष्टमीच्या दिवशी गौरीपूजन करून पुरणाचा, पंचपक्वान्नांचा नैवेद्य दाखविला जातो. संध्याकाळी मित्र-मैत्रिणींना प्रसाद, पानसुपारी व हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करून रात्री झिम्मा-फुगड्या, घागरी फुंकणे असे खेळ खेळून जागरण केले जाते. घराघरातील प्रथेप्रमाणे गौरी-गणपतींचे श्रद्धेने विसर्जन केले जाते. गौरी गणपतीच्या या उत्सवाने मनाला समाधान लाभते तर व्रतवैकल्यांच्या आणि कुळधर्म, कुळाचारांच्या आचरणाने आपल्याला एक शक्ती आणि सामर्थ्य प्राप्त होते!

आपल्या संस्कृतीत एक सुंदर भावना आहे. लेक म्हणजे घरातली लक्ष्मी. ती माहेरी असते तेव्हा ती 'घरची लक्ष्मी' असते आणि सासरी गेल्यावर ती 'महालक्ष्मी' बनते. किती सुंदर आहे ना हा विचार! मुलगी लग्न करून सासरी जाते, तेव्हा ती केवळ एक घर सोडत नाही; ती दोन कुटुंबांना जोडणारा मायेचा सेतू बनते. तिच्या हसण्यात दोन घरांचं सुख असतं, तिच्या समाधानात दोन कुटुंबांची समृद्धी असते आणि म्हणूनच गौरीपूजनाच्या निमित्ताने तिच्यातील त्या स्त्रीशक्तीला, कतृर्त्वाला आणि मातृत्वाला वंदन केलं जातं.

गौरी म्हणजे केवळ ऐश्वर्याची देवता नाही. ती सौख्याची, मांगल्याची, पावित्र्याची, समृद्धीची आणि कुटुंबाला जोडून ठेवणार्या मायेची देवी आहे. तिच्या आगमनाने घरात फक्त सजावट होत नाही; मनं सजतात, नाती फुलतात, आठवणी जाग्या होतात आणि संस्कारांची परंपरा पुढच्या पिढीकडे पोहोचते. म्हणूनच गौरींचं आगमन म्हणजे फक्त सण नाही, तो आहे माहेरच्या मायेचा उत्सव, स्त्रीशक्तीचा सन्मान, कृषी संस्कृतीची आठवण आणि कुटुंबाला एकत्र बांधणार्या प्रेमाचा सोहळा. आज गौरी घरात आल्या आहेत, त्यांच्या चरणांशी एकच प्रार्थना, 'आई, आमच्या घरात सदैव प्रेम राहू दे, नात्यांमध्ये आपुलकी राहू दे, मनात समाधान राहू दे, घरात आरोग्य, सुख आणि समृद्धी नांदू दे, अन्नाची किंमत आणि कष्टाची जाणीव कधीही विसरू देऊ नकोस आणि आमच्या या सुंदर परंपरा पुढच्या पिढ्यांपर्यंत जपण्याची शक्ती आम्हाला दे!'



### कथा गजाननाच्या

## श्रींची इच्छा

तारा प्रद्युम्न देशपांडे/८४५९०७२८४९

शेगावात एके दिवशी समर्थ उदास मनाने बसले होते. भक्तगण त्यांना म्हणू लागले, 'महाराज आपले मन उदास का आहे?' तेव्हा महाराज म्हणाले, 'आमचा कृष्णा पाटील गेला. तो आम्हाला रोज सुपारी आणून देत होता. त्याची आम्हाला आठवण झाली. त्याचा मुलगा अजून लहान आहे. आता सुपारी कोण आणून देईन? तो मोठा झाल्यावर माझी सेवा करेल म्हणून मी या मठात आता राहणार नाही.' असे समर्थ बोलताच सर्व भक्त चिंतातूर झाले. समर्थांचा येथून जाण्याचा विचार दिसतो, पण कसेही करून आपण त्यांना जाऊ द्यायचे नाही. सगळी मंडळी समर्थांसमोर आली. श्रीपतराव, बंकटलाल, ताराचंद, मारुती यांनी स्वामींचे चरण धरले. महाराज आम्हाला सोडून वेगळ्या ठिकाणी जाऊ नका. शेगावात तुमची इच्छा जिथे असेल तिथे राहा, परंतु हे गाव सोडण्याचे मनात आणू नका. महाराज म्हणाले, 'जी जागा कोणाची नसेल, अशी जागा जर मला द्याल तरच माझं शेगावात राहणं होईल.' सगळ्या भक्तांना काळजी वाटू लागली. ते कोणाच्या जागेवर राहण्यास तयार नाही. सरकार यांच्यासाठी जागा कशी देईल? आपल्या समर्थांचे सरकारला काय महत्त्व आहे?



बंकटलाल बोलला, 'असं संकट तुम्ही घालू नका! सरकार धार्मिक कामाला जागा देईल, याचा भरवसा नाही. आमच्यापैकी कोणाचीही जागा मागा. आमची देण्याची तयारी आहे.' समर्थ म्हणाले, 'तुम्ही किती अज्ञानी आहात. जमिनीची मालकी सच्चिदानंद श्रीहरीची आहे. आजवर या जगात किती राजे होऊन गेले. जागा सरकारी कशाची, येथील मालक पांडुरंग आहे. व्यवहाराच्या दृष्टीने राजाला त्याची मालकी असते. प्रयत्न केला तर जागा मिळेल. हरी पाटलाच्या हाताला यश येईल.' नंतर सगळी मंडळी हरिपाटलाकडे आली. त्याला सगळ्यांनी जागेसाठी अर्ज केला. बुलढाण्याचा करी नावाचा मोठा अधिकारी होता. त्याने अर्ज वाचून एक एकर जागा दिली आणि म्हणाला की, तुम्ही दोन एकराचा अर्ज केला तरी मी आता एक एकर जागा देतो. तुम्ही एक वर्षात जागा व्यवस्थित ठेवली तर तुम्हाला आणखी जागा देऊन साहाय्य करीन. तो सरकारचा ठराव मी कोर्टात फाईलीमध्ये लिहून ठेवत आहे, मग हरी पाटील बंकटलाल वर्गणी जमविण्याकरिता गावात निघाले. वर्गणी जमा झाली आणि मठ बांधण्याचे काम सुरू झाले.

## गणा धाव रे...

श्रीकांत भास्कर तिजारे/९४२३३८३९६६

**ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।**
**जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।**
**देवा तूंचि गणेशु। सकलार्थमतिप्रकाशु।**
**म्हणे निवृत्तीदासु। अवधारिजो जी।।**

संत ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिकेच्या पहिल्याच अध्यायात विश्वात्मक ईश्वराची वंदना करताना श्रीगणेशाला साक्षात शब्दब्रह्माचे सगुण शरीर मानले आहे. वैश्विक ओंकारनादातून सृष्टीचे मूळ उलगडताना संत तुकाराम महाराजही याच अद्वैत तत्त्वाचा निर्वाळा देतात.

**ओंकार प्रधान रूप गणेशाचे।**
**हे तिन्ही देवांचे जन्मस्थान।।**
**अकार तो ब्रह्मा उकार तो विष्णू।**
**मकार महेश जाणियेला।।**

वैदिक संहितेत ज्या ओंकाराला सृष्टीचा आद्य स्पंद मानले गेले, तोच ओंकार म्हणजे आपला लाडका बाप्पा होय.

अथर्ववेदाशी संलग्न असलेल्या गणपती अथर्वशीर्षात 'त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि' असे म्हणून गणेशाला अंतिम सत्य आणि विश्वाचे अधिष्ठान म्हटले आहे. योगमार्गाच्या दृष्टीने 'त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम्' या वचनानुसार गणपती मानवी शरीरातील मूलाधार चक्रावर वास करतो. जोपर्यंत मूलाधार चक्रातील ऊर्जा स्थिर होत नाही, तोपर्यंत माणसाची प्रज्ञा ऊर्ध्वगामी होऊ शकत नाही. म्हणूनच गणेशाची उपासना ही बाह्य कर्मकांडा सोबतच स्वतःमधील विवेक, संयम आणि बुद्धिमत्ता जागृत करण्याची ती एक आंतरिक साधना ठरते.

देवर्षी नारदांनी नारद पुराणात जनकल्याणासाठी कथन केलेले संकटनाशन स्तोत्र हे संकटमुक्तीचे मंत्रसाधन वाटत असले, तरी संकटांशी भिडण्याची ती एक वैचारिक आचारसंहिता आहे. 'प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम्। भक्तावासं स्मरेन्नित्यमायुष्कामार्थसिद्धये।।' यातील 'भक्तावासं' हा शब्द अत्यंत मार्मिक आहे; देव मंदिराच्या दगडी गाभार्यापेक्षा वा भपकेबाज मंडपांपेक्षा भक्ताच्या शुद्ध अंतःकरणात वास करतो.

भारतीय भक्तिपरंपरेत शब्दांपेक्षा भाव महत्त्वाचा मानला गेला आहे. वेदांमधील ऋचा, उपनिषदांमधील तत्त्वज्ञान आणि पुराणांमधील स्तोत्रे जितकी श्रेष्ठ आहेत, तितकीच एका सामान्य भक्ताच्या अंतःकरणातून संकटाच्या क्षणी फुटलेली आर्त हाकही ईश्वराला प्रिय असते. ज्येष्ठ संगीतकार देवदत्त साबळे यांच्या सुरांनी अजरामर केलेल्या 'गणा धाव रे, मला पाव रे.. तुझ्या प्रेमाचे किती गुण गाऊ रे' या गीतातील 'गणा धाव रे' हे तीन शब्द मानवी जीवन, अध्यात्म आणि ईश्वरी कृपेचा एक अद्‌भूत त्रिवेणी संगम आहेत. गणेशोत्सवाच्या धामधुमीत जेव्हा आपण बाप्पाच्या आगमनाचा सोहळा साजरा करतो, तेव्हा या तीन शब्दांचा आध्यात्मिक अर्थ समजून घेणे प्रत्येकासाठी अंतर्मुख करायला लावणारे ठरते.



'गण' या शब्दाचा व्यावहारिक अर्थ समूह किंवा प्रजा असा असला, तरी योगशास्त्र आणि अध्यात्मात 'गण' म्हणजे आपल्या शरीरातील ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, मन, बुद्धी आणि चित्त यांचा समूह. मानवी जीवनातील बहुतेक संकटे ही या इंद्रियांच्या स्वैराचारामुळे निर्माण होतात. जेव्हा साधक 'गणा' अशी साद घालतो, तेव्हा तो केवळ आकाशातील किंवा देव्हाऱ्यातील सगुण रूपाला पुकारत नसतो; तर आपल्या देहरूपी रथावर आणि इंद्रियांवर नियंत्रण ठेवणाऱ्या त्या वैश्विक चेतनेला, म्हणजेच गणपतीला साद घालत असतो. संत तुकाराम महाराजांनी गणेशाला 'तो हा गजानन मायबाप' असे म्हटले आहे. सर्व गणांचे पोषण करणारा आणि मूलाधार चक्रात स्थिर राहून प्रज्ञा देणारा मूळ आधार म्हणजे 'गण.'

मानव जोपर्यंत स्वतःच्या बुद्धीच्या आणि संपत्तीच्या बळावर जगत असतो, तोपर्यंत तो कोणापुढेही झुकत नाही. परंतु, जीवनात असा एक क्षण येतो, जेव्हा स्वतःचे सर्व उपाय थकतात, बुद्धी कुंठित होते आणि संकटांचा डोंगर समोर उभा राहतो. अशा वेळी जेव्हा मुखातून 'धाव' हा शब्द बाहेर पडतो, तेव्हा माणसाचा 'मी'पणा आणि अहंकार पूर्णपणे गळून पडलेला असतो. भक्तिमार्गात याला 'प्रपत्ती' किंवा संपूर्ण शरणागती म्हटले जाते. गीतात पुढे ओळ येते, 'माझी वादळात सापडली नाव रे, दूर किनारी हाय माझा गाव रे...' हा भवसागर म्हणजे एक अथांग वादळ आहे.

वासना, चिंता, मत्सर आणि संकटांच्या लाटांनी माणसाची जीवननौका डळमळू लागते, तेव्हा त्याला जाणवते की, स्वतःच्या हातातील वल्ह्यांनी ही नाव पैलतीरावर पोहोचणे अशक्य आहे. म्हणूनच जेव्हा अंतःकरणातून 'धाव' असा टाहो फुटतो, तेव्हा भौतिक संकटातून वाचवण्यासोबतच अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या किनाऱ्याकडे नेण्यासाठी त्या विघ्नहर्त्याला घातलेली साद असते.

'गणा धाव' या दोन शब्दांनंतर येणारा 'रे' हा प्रत्यय या नात्यातील परमोच्च बिंदू आहे. सहसा ईश्वराचा उल्लेख करताना माणूस आदराने 'प्रभू', 'महाराज', 'भगवंत' किंवा 'स्वामी' अशी औपचारिक भाषा वापरतो. परंतु 'रे' या शब्दात सर्व औपचारिकता गळून पडतात. एक लहान मूल जेव्हा संकटात सापडते किंवा अंधारात घाबरते, तेव्हा ते आपल्या आई-वडिलांना अतिशय हक्काने आवाज देते. 'रे' या शब्दात तोच अकृत्रिम जिव्हाळा, वात्सल्य आणि अधिकार भरलेला आहे. भक्त देवाला सांगतो, तू केवळ जगाचा नियंता नाहीस, तर तू माझा सखा, माझा मायबाप आहेस आणि माझ्या संकटात धावून येणे हे तुझे कर्तव्यच आहे. ईश्वराला 'तू' आणि 'रे' म्हणण्याचे हे धाडस केवळ निस्सीम प्रेमातून आणि अद्वैत भावातूनच निर्माण होऊ शकते.

आज गणेशोत्सवाचे स्वरूप पाहताना मनात विचार येतो की, या उत्सवात डीजेचा कानठळ्या बसवणारा दणदणाट आहे, देखाव्यांचा झगमगाट आहे, पैशांचे आणि शक्तीचे प्रदर्शन आहे; पण या बाह्य कोलाहलात भक्ताच्या अंतःकरणातील ती मूळ आणि आर्त हाक कुठे हरवली आहे की काय? 'गणा धाव रे' ही हाक रस्त्यावरील लाऊडस्पीकरवरून ओरडून सांगण्याची गोष्ट नाहीच, ती अंतर्मनातून यावी लागते. या उत्सवानिमित्त आपण बाप्पाकडे काय मागायला हवे? केवळ भौतिक सुख-समृद्धी? खरी प्रार्थना ही असायला हवी. हे गणा, माझ्या मनातील विकृतींवर मात करण्यासाठी धाव! माझ्या बुद्धीला विवेकाची दिशा देण्यासाठी धाव! समाजातील द्वेष, विषमता आणि स्वार्थाचे वादळ शमवण्यासाठी धाव! जोपर्यंत माणूस स्वतःच्या अहंकाराचे विसर्जन करून ईश्वराच्या चरणी लीन होत नाही, तोपर्यंत त्याचे संकट निवारण होऊ शकत नाही. 'गणा धाव रे' हे तीन शब्द आपल्याला हेच शिकवतात की, संकटे कितीही मोठी असली तरी जर आपल्याकडे शरणागतीचा भाव असेल आणि अंतःकरणात विशुद्ध प्रेम असेल, तर विघ्नहर्ता गजानन एका हाकेवर धावून आल्याशिवाय राहत नाही.

या गणेशोत्सवात बाप्पाच्या मूर्तीसमोर हात जोडताना आपल्याही मनात हीच भावना जागी व्हावी, हे बाप्पा, बुद्धीच्या या वादळातून माझ्या विचारांना योग्य दिशा दे आणि अंतःकरणातील विवेकाचे रक्षण करण्यासाठी धावून ये! बुद्धीची प्रगल्भता, सामाजिक ऐक्य आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याचा हा विवेक आपल्या सर्वांच्या अंतःकरणात जागा होवो!

**गणपती बाप्पा मोरया!**

### ज्ञानेशकन्या

## अलौकिक भक्ती

डॉ. अलका इंदापवार/८४५९१२३६६९

'अलौकिक भक्ती' या विषयाचा विचार करण्यापूर्वी प्रथम श्री गुलाबराव महाराजांची भूमिका, त्यांचे अवतार कार्य त्यांची लोकोद्धाराची तळमळ, भक्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी केलेली तर्कशुद्ध मांडणी विसरून चालणार नाही. श्री गुलाबराव महाराज या पृथ्वीतलावर कशासाठी अवतरलेत, त्याची पूर्वपीठिका त्यांनी स्वतःच निवेदन केलेली आहे. 'स्वमंतव्यांशसिद्धांत तुषार' या छोटेखानी ग्रंथात त्यांनीच प्रश्न आणि उत्तर निर्माण करून अधिकारवाणीने 'मी कोण आहे, कशासाठी आलो आहे' हे आपल्या सखीशी केलेल्या संवादातून सांगितले आहे.

**सखीवचन** : तुम कौन हो?

**उत्तर** : मै ज्ञानेश्वरकन्या और कृष्णपत्नी हूं।

**सखीवचन** : तुम्हारा जगत में आने का क्या प्रयोजन है?

**उत्तर** : भक्ती स्थापन का यथामती प्रयत्न करना।

**सखीवचन** : भक्ती स्थापन करने की किनकी आज्ञा है?

**उत्तर** : श्री भगवान नारदाचार्य मुनी की।

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, श्री महाराजांचे ग्रंथ व विषय अनेक असले तरी प्रतिपाद्य मुख्य विषय भक्तीची प्रतिष्ठापना हा आहे. श्री गुलाबराव महाराजांनी मनोनिरीक्षणापासून व्याख्यानांना सुरुवात करून ही व्याख्यानमाला चढत्या वाढत्या क्रमाने अमरत्व शोधापर्यंत नेऊन पोहोचविली आहे. माझ्या दृश्य आणि अदृश्य श्रोत्यांना, अशी व्याख्यानाला सुरुवात करून, अदृश्य श्रोते येथे उपस्थित आहेत, हे त्यांना दिसते. यातूनच श्री महाराजांचे अलौकिकत्व सिद्ध होते.

या व्याख्यानमालेतील सातवे प्रकरण 'अलौकिक भक्ती' नावाचे असून, प्रत्येक माणसाला सुखाची वासना आहे, त्यासाठी आस्तिक-नास्तिक सर्वजण या अक्षय सुखासाठी प्रयत्न करीत असतात. नित्य विषयसुख मिळावे यासाठी प्रयत्न करणारे नास्तिक लोक सध्याचे सुख पाहतात. पुढे येणारे रोग, वृद्धत्व याकडे दुर्लक्ष करतात. तर आस्तिक लोक क्षणिक सुखाच्या मागून येणाऱ्या दुःखाने आधीच सावध होऊन वरवर दिसणार्या इंद्रियजन्य सुखाला बाजूला सारतात, त्यामुळे विषयरहित अशा समाधानात त्यांना सुख वाटते. याप्रमाणे प्रत्येक मनुष्य आपले अमर सुख भोगण्याचा प्रयत्न करीत असतो.

आस्तिकांना मिळणारे हे सुख आत्मप्रीतीला अनुसरून असते. त्यांनी आपल्या भावना सामर्थ्याने त्याचा अनुभव घेतलेला असतो. भक्तीच्या प्रांतामध्ये भावना आणि भावनांचे त्रिविध संवेग अत्यंत उपयुक्त ठरतात, असे श्री महाराजांनी विवेचन केलेले आहे. भावना म्हटले की, साहजिकच मनोव्यापार, जो दृश्यकोटीत येत नाही, पण अनुभवता मात्र येतो असा आहे. त्यामुळेच या भक्तीतील भावना आविष्काराला अलौकिक असे म्हणावे लागते.

**मूर्तिपूजा, प्राणप्रतिष्ठा** : भगवंताप्रति आपली भावना व्यक्त करण्यासाठी मूर्तिपूजा केली जाते. ही मूर्तिपूजा करीत असताना भाव सामर्थ्याने त्या जड वस्तूमध्ये प्राणप्रतिष्ठा होत जाते. त्यामुळे भक्ताला त्या मूर्तीमध्ये पाषाण किंवा धातू यांचे अंश दिसत नाहीत. गुलाबराव महाराजांनी याचे वर्णन करताना, सामवेदातील प्रतिकोपासना आणि विवेकचुडामणीतील श्रद्धा आणि भक्ती यांचा संदर्भ दिला आहे. या प्रतीकाचे ठिकाणी भक्ताला चैतन्यरूपता अनुभवाला येते. गुलाबराव महाराज असे म्हणतात की, भगवान रामकृष्ण परमहंस यांनाही कालिमातेच्या मूर्तीमध्ये प्रत्यक्ष देवीची अनुभूती होत असे. ते म्हणत असत की, तुम्हाला आपल्या आईची मूर्ती मृण्मयी कशी वाटते? भक्तीमध्ये भगवंताची पूजा करताना त्यात प्रत्यक्ष चैतन्याचा अनुभव येणे, हा भक्तीचा मृदू संवेग असून, तिला कनिष्ठ भक्ती म्हटले जाते. असे महाराज सांगतात.

**मानसपूजारूप मध्यमभक्ती** : मूर्तिपूजा नित्य नियमाने करीत असताना प्रेमाने भाव जागृत होऊन भगवंत मूर्तीतील कठोरता निघून जाते आणि त्यामध्ये सजीवता निर्माण होते. भगवंताशी संवाद सुरू होतो. त्यामुळे साहजिकच ती पूजा नियमबद्ध यांत्रिकतेने न होता तिला मानसिकतेचे स्वरूप येऊ लागते. या ठिकाणी श्री महाराजांनी वल्लभाचार्यांचा वचनाचा आधार दिलेला आहे. 'कृष्णसेवा सदा कार्या मानसी सा परा मता' श्री महाराज आणखी एक आधार देतात की, 'उत्तमा मानसी पूजा' अशी एक स्मृती आहे. 'करावी ती पूजा मनेची उत्तम' असे तुकाराम महाराजही म्हणतात. यावरून मानसिक पूजा हिलाच मध्यमाभक्ती असे म्हटले जाते. ही मानसपूजा केल्यावर जी मध्यम भक्तीची स्थिती येते, त्यावेळी ईश्वरावर असणारे प्रेम वृद्धिंगत होते. साधूंच्या ठिकाणी मैत्री आणि दीनांवर दया तसेच दुष्टांची उपेक्षा अशा मनोवृत्तीने वागणूक होऊ लागते.

**उत्तमाभक्ती** : या भक्तीत मूर्तीचा पाषाण वा धातूतील कठीणपणा निघून जाऊन मनुष्य देहरूपी सुकुमारपणा मध्य संवेगात आलेलाच असतो. आता केवळ प्रेममय आनंदरूप सुकुमार साकार असा सच्चित् आनंदस्वरूप भगवंत, प्रेमाचा विषय बनतो आणि त्याच निर्विकल्प आनंदात तो भक्त तल्लीन राहतो. व्यवहार करीत असतानाही त्याला भगवंताचे, त्याच्या सुखाचे, आनंदाचे विस्मरण होत नाही. श्री महाराजांनी या उत्तमभक्ती योगाच्या वर्णनासाठी घेरंडाचार्य आणि भागवतातील आधार दिलेला आहे.

**भक्ताची उच्च कोटीची अवस्था** : या पृथ्वीवर तीन प्रकारच्या सत्ता अस्तित्वात आहेत. एक व्यावहारिक सत्ता, दुसरी प्रातिभासिक सत्ता, तिसरी पारमार्थिक सत्ता. व्यावहारिक सत्ता म्हणजे हे दृश्य जग होय. प्रतिभाषिक सत्ता म्हणजे जी मनाने कल्पिल्या जाते ती. ज्या काव्य कल्पना असतात, त्यांना प्रातिभाषिक सत्ता म्हणता येते आणि तिसरी परमार्थिक सत्ता, मनाच्या पलीकडे असून, देहादिक इंद्रियांच्याही पलीकडे आहे. ही पारमार्थिक सत्ता अदृश्य रूपामध्ये देहादी विषय सुटल्यावर अनुभवाला येते. त्याच ठिकाणी ईश्वराचे संपूर्ण अस्तित्व प्रत्ययाला येते. म्हणून भक्तीला अलौकिक भक्ती असे म्हटले आहे.

भगवद्‌गीतेच्या अकराव्या अध्यायात भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला विश्वरूप दर्शन दाखविले आणि ते आपल्या दिव्य अवयवांचे, शरीराचे वर्णन करू लागले. परंतु अर्जुनाला ते दृश्य झाले नाही. ज्यावेळी 'दिव्यम् ददामि ते चक्षुः' असे म्हणून भगवंताने दिव्यदृष्टी अर्जुनाला बहाल केली, तेव्हा कुठे अर्जून विश्वरूपाचे दर्शन घेऊ शकला. त्याचप्रमाणे मृदू संवेगापासून सुरू झालेली ही भक्ती उच्च स्तरावर गेली की, तिचे स्वरूप केवळ मूर्तिपूजा, मानसपूजा असे मर्यादित न राहता ते अदृश्य अलौकिक सत्तेमध्ये प्रविष्ट होते. अशा या अनिर्वचनीय, अतुलनीय, अद्वितीय, अविट, अनंत, अस्फूट भक्तीला श्री महाराजांनी अलौकिक म्हटले आहे, ते यथार्थ ठरते. अशा या दिव्य सुखाची, अलौकिक भक्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठीच मधुराद्वैताचार्य श्री गुलाबराव महाराजांचा अवतार झाला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# दिला इशारा, जाता जाता!

हवामान बदल किंवा वातावरणातील बदल तसेच ग्लोबल वॉर्मिंगसारख्या समस्या यापुढे दिवसेंदिवस तीव्र होत जाणार असून त्यामुळे संभाव्य आपत्तींशी सामना करण्याचे मोठे आव्हान जगासमोर राहणार आहे हे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आपत्ती ओढवल्यानंतर आक्रोश करत केवळ बचावासाठी धडपडत राहण्याऐवजी आपत्तींचा फटका अधिकाधिक सौम्य कसा करता येईल, आपत्तींमुळे होणाऱ्या जीवित किंवा वित्तहानीचे प्रमाण कमीत कमी कसे राखता येईल यासाठी अधिकाधिक प्रयत्न करण्याचाच खरा समंजसपणा आहे, हेदेखील आता ओळखले पाहिजे. अशा आपत्तींनी आजवर जगाच्या कानाकोपऱ्यात अनेकांच्या जगण्यावर असंख्य ओरखडे ओढले. ज्यांना नैसर्गिक आपत्ती म्हटले जाते, अशा संकटांनी असंख्य जिवांचा घास घेतला, घाम गाळून उभ्या केलेल्या विकासचिन्हांची वाताहत करून टाकली आणि अशा संकटांसमोर हतबलपणे हात टेकण्याखेरीज आपण काहीही करू शकत नाही याची जाणीवही या आपत्तींनी करून दिली. काही वेळा, समस्या हा दैनंदिन जगण्याचाच भाग होऊन जातो. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या किंवा हिमालयात उगम पावलेल्या नद्यांच्या तीरावर वसलेल्या असंख्य लहानमोठ्या गावांना तर आपत्तींना तोंड देण्याची सदैव तयारी ठेवावी लागते. नैसर्गिक आपत्ती म्हणून अशा संकटांना दूषणे देण्यापेक्षा या आपत्तींच्या उत्पत्तीमधील आपल्या पापाचा वाटा किती आणि त्याच्या फटक्यातून होणारी आपल्या पापाची परतफेड किती याचा लेखाजोखा मांडण्याची वेळ आता आली आहे.

त्याचा पहिला इशारा यंदाच्या मान्सूनच्या पावसाने दिला. या आठवड्याभरात मान्सूनच्या पावसाचा परतीचा प्रवास सुरू होणार असल्याचे हवामान खात्याने जाहीर केले आहे. त्यामुळे, नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याच्या दिवसांत मान्सूनच्या वाऱ्यांनी पावसाची जी काही वाताहत करून टाकली, त्याच्या परिणामांचे चटके आता सुरू होणार आहेत यात शंका नाही. यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाळा अनियमित आणि अपुरा असेल असे भाकीत पावसाळ्याआधीच वर्तविले गेले होते. अपुऱ्या पावसाने ते खरे करून दाखविले. त्यामुळे, पुढच्या पावसाळ्यापर्यंतच्या काळात अपुऱ्या पावसाच्या परिणामांना तोंड देण्याची सज्जता करणे आता क्रमप्राप्त ठरणार आहे. येत्या काळात पाणीटंचाईचा प्रश्न अधिक तीव्र होणार आहे. नद्या, कालवे, धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा नसल्याने, पाणीटंचाईचे फटके दैनंदिन जनजीवनाबरोबरच शेती, उद्योगक्षेत्रासही बसणार असल्याने त्याचे थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम घरोघरी सोसावे लागण्याची चिन्हे उमटवूनच पावसाळ्याच्या परतीच्या प्रवासाची वाट धरली आहे. त्यामुळे, मान्सूनची माघार ही केवळ हवामानशास्त्रीय घडामोड राहिली नसून ती देशातील पाणीटंचाई, अन्नधान्याचे उत्पादन, अर्थकारण आणि समाजजीवनावर दूरगामी परिणाम करणारी ठरणार आहे. यंदा पावसाने सुरुवातीपासूनच हुलकावणी दिली. देशाच्या अनेक राज्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस नोंदविला गेल्याने, पाणीसाठ्याचे स्त्रोत पुरते भरले नाहीत.

सुदैवाने, महाराष्ट्राला या संभाव्य संकटाची जाणीव असल्याचे दिसते, ही समाधानाची बाब आहे. मुळात या संकटाकडे नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहिले जात असले, तरी त्याचे संपूर्ण खापर केवळ निसर्गावर फोडणे हा निसर्गावरील अन्याय ठरणार आहे. निसर्ग कोपतो, नद्या रौद्ररूप धारण करतात, आकाश फाटल्यागत पाऊस कोसळतो किंवा कायमची दडी मारतो, उन्हाळा अंग भाजून काढतो, कडाक्याची थंडी जीवघेणी ठरते, दुष्काळात जमिनीला भेगा पडतात, तेव्हा आपण नैसर्गिक आपत्ती म्हणून त्याकडे पाहत हतबल होत असलो, तरी गेल्या काही दशकांतील अशा आपत्तींचा इतिहास पाहता या समजुतीला बराचसा छेद मिळत असून निसर्गाच्या वाटेवर विकासाच्या नावाखाली निर्माण केले गेलेले अनेक अडथळेच या आपत्तींना अधिक उग्र करत असल्याचे या इतिहासावरून स्पष्ट झाले आहे. सुमारे बारा वर्षांपूर्वी उत्तराखंडवर प्रलयाच्या रूपाने कोसळलेल्या आपत्तीने वास्तवाचे भान तेव्हाच करून दिले होते. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या तेव्हाच्या अहवालानुसार या आपत्तींचे मूळ नैसर्गिक असले तरी मानवी हस्तक्षेपामुळे आपत्तींचे रूप अधिक उग्र झाले आणि असुरक्षितता अनेक पटींनी वाढली असे स्पष्ट झाले होते. सुमारे आठ वर्षांपूर्वी केरळमधील महापुरामुळे भूस्खलनाच्या साडेतीनशे घटना घडल्या, सुमारे ५० लाखांहून अधिक लोकसंख्येला या संकटाचा फटका बसला, सुमारे साडेचारशे लोकांचा मृत्यू ओढवला, तेव्हाच्या अनेक अहवालांतही, केवळ नैसर्गिक आपत्तींवर याचा ठपका ठेवलेला नव्हता. आपत्ती व्यवस्थापन, जलसंपदा व्यवस्थापन, जलस्त्रोतांचे नियोजन, या सर्वांचा आपत्तींच्या तीव्रतेशी संबंध असतो, ते नेपाळमधील प्रलयानेही दाखवून दिले आहे. भारतात तर आपत्तींना आमंत्रण देणाऱ्या बेफिकिरीचा सुळसुळाट दिसतो. महाराष्ट्रात आजवरच्या अनुभवातून पाणलोट क्षेत्रविकास, जलसंधारण, भूजलाचे पुनर्भरण, पीक पद्धती आणि शेतीचे नियोजन यांचे महत्त्व वारंवार अधोरेखित झाले आहे. पाऊस किती पडावा हे आपल्या हातात नसेल, तर पडणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन कसे करावे, किती पाणी जमिनीत मुरवावे, किती पाण्याचा वापर शेतीसाठी करावा, किती पाणी उद्योगांकरिता वापरावे आणि किती पाणी पिण्याकरिता राखून ठेवावे याचे निर्णय घ्यावे लागणार आहेत. आता अपुऱ्या पावसाने तीच वेळ आणली आहे. मान्सून तर न बरसताच माघारी निघाला असल्याने, आता संकटाकडे पाहत राहण्यापेक्षा संकटाची तीव्रता कमी करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांना सुरुवात करावीच लागणार आहे.

राज्याच्या दुष्काळप्रवण भागांतील पुढच्या पिढ्यांना दुष्काळ पाहावा लागू नये याकरिता महाराष्ट्रात फडणवीस सरकारने उचललेली काही ठोस पावले यादृष्टीने दिलासादायक म्हणावी लागतील. कृष्णा खोऱ्यातील पाणी फ्लड मिटिगेशनच्या माध्यमातून भीमा खोऱ्यातून मराठवाड्यात आणण्याच्या राज्य सरकारच्या योजनेला जागतिक बँकेने मान्यता दिली आहे. या योजनेच्या माध्यमातून सुमारे ३० टीएमसी अतिरिक्त पाणी उपलब्ध झाले की मराठवाड्याच्या दुष्काळाचे चटके कमी होऊ शकतात. याशिवाय उल्हास खोऱ्यातून गोदावरीच्या खोऱ्यात पाणी आणण्याची योजना कार्यान्वित झाली की मराठवाडा कायमचा दुष्काळमुक्त होऊ शकतो असा सरकारचा विश्वास आहे. सरकारची इच्छाशक्ती, योग्य नियोजन आणि निधीचा पुरेसा पुरवठा या उपाययोजनांच्या त्रिसूत्री प्रामाणिकपणे एकत्र आणल्या तर परिस्थितीचे चटके सहन करण्याची शक्ती येऊ शकते, हे महाराष्ट्राच्या या योजनांतून दिसते. त्यामुळे, मान्सूनच्या माघारीपाठोपाठ समोर उभ्या राहणाऱ्या संभाव्य संकटांना आता केवळ एकतर्फी आक्रमणाची संधी मिळणार नाही. त्याला तोंड देण्यासाठी समोर उपाययोजनांचे सैन्य सज्ज असेल, तर सामाजिक आत्मविश्वासही वाढतो. दुष्काळ ही केवळ पाऊस कमी पडण्यामुळे निर्माण होणारी कथा नाही. गेल्या ५० वर्षांच्या अभ्यासानुसार, देशातील ७५ टक्क्यांहून अधिक जिल्हे आणि साठ कोटींहून अधिक लोकसंख्या हवामानविषयक घडामोडींच्या सावटाखाली वावरत आहे. अनेक भागांतील पारंपरिक दुष्काळग्रस्त भागांत महापूर, अतिवृष्टीची संकटे दिसू लागली आहेत, तर पूरप्रवण क्षेत्रे दुष्काळग्रस्त होताना दिसू लागली आहेत. यासाठी केवळ निसर्ग जबाबदार नाही. या बदलांची जबाबदारी माणसांसही घ्यावी लागेल. म्हणून, आपत्ती येण्याआधीच त्यावर मात करण्याची तयारी हाच उपाय ठरतो. त्यासाठी नियोजन करावे लागेल. परतीच्या पावसाने जाता जाता हा इशारा दिला आहे. ■

## अर्थविशेष

**ॲड. हितेश पारसे**

# कर नियोजन वर्षाच्या सुरुवातीपासूनच

भारतीय करव्यवस्थेत १ एप्रिल २०२६ पासून एक महत्त्वपूर्ण बदल झाला आहे. गेल्या अनेक दशकांपासून लागू असलेला आयकर अधिनियम, १९६१ याची जागा आयकर अधिनियम, २०२५ याने घेतली आहे. नवीन कायद्याचा मुख्य उद्देश करदात्यांसाठी करकायदा अधिक सुटसुटीत, स्पष्ट आणि समजण्यास सुलभ करणे हा आहे. मात्र सामान्य करदात्याच्या दृष्टीने खरा प्रश्न असा आहे की, "कायदा बदलला, पण माझ्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांमध्ये मी नेमके काय बदल करायला हवेत?"

हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण नवीन कायदा म्हणजे केवळ जुन्या कलमांच्या क्रमांकांमध्ये झालेला बदल नाही. करदात्याने आपल्या उत्पन्नाचे, गुंतवणुकीचे, मालमत्तेचे, आर्थिक व्यवहारांचे आणि कर भरण्याचे नियोजन अधिक शिस्तबद्ध पद्धतीने करण्याची ही योग्य वेळ आहे.

**कर वर्षाची नवी संकल्पना :** जुन्या आयकर कायद्यात 'मागील वर्ष' आणि 'आकलन वर्ष' या दोन वेगवेगळ्या संकल्पनांमुळे सामान्य करदात्यांना अनेकदा संभ्रम निर्माण होत असे. नवीन आयकर कायद्यात 'कर वर्ष' ही तुलनेने सोपी संकल्पना स्वीकारण्यात आली आहे. १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत मिळणारे उत्पन्न हे कर वर्ष २०२६-२७ शी संबंधित असेल. मात्र येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील उत्पन्नासाठी २०२६ मध्ये दाखल होणारे विवरणपत्र जुन्या आयकर कायद्यानुसार असेल; तर १ एप्रिल २०२६ नंतर सुरू होणाऱ्या कालावधीसाठी नवीन आयकर कायदा लागू होईल. त्यामुळे संक्रमणाच्या काळात करदात्याने जुना आणि नवीन कायदा यामधील फरक समजून घेणे आवश्यक आहे.

**१. कर नियोजनाची पद्धत बदला :** भारतात अनेक करदाते आर्थिक वर्ष संपण्याच्या काही दिवस आधी करबचतीच्या गुंतवणुकीचा विचार करतात. मार्च महिना आला की विमा, गुंतवणूक, कर्जाची परतफेड किंवा इतर करबचतीचे पर्याय शोधले जातात. ही पद्धत आता बदलण्याची गरज आहे. कर नियोजन म्हणजे केवळ कर वाचविणे नव्हे. कर नियोजनामध्ये – उत्पन्नाचे नियोजन, गुंतवणुकीचे नियोजन, मालमत्ता खरेदी-विक्रीचे नियोजन, भांडवली नफ्याचे नियोजन, व्यवसायातील खर्चाचे नियोजन, आगाऊ कराचे नियोजन, कुटुंबातील मालमत्ता हस्तांतरणाचे नियोजन, कर्ज व व्याजाचे नियोजन, या सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. व्यवहार झाल्यानंतर कराचा विचार करण्यापेक्षा व्यवहार करण्यापूर्वी कराचा परिणाम समजून घेणे अधिक योग्य आहे. विशेषतः मालमत्ता विक्री, मोठी गुंतवणूक, व्यवसायातील पुनर्रचना, भागीदारीतील बदल किंवा कुटुंबातील मालमत्ता हस्तांतरण अशा व्यवहारांपूर्वी करसल्ला फायदेशीर ठरू शकते.

**२. वार्षिक माहिती विवरणाकडे दुर्लक्ष करू नका :** आज आयकर विभागाकडे करदात्याच्या आर्थिक व्यवहारांची मोठ्या प्रमाणावर माहिती उपलब्ध होते. बँक व्यवहार, व्याज, लाभांश, समभागांची खरेदी-विक्री, सामूहिक गुंतवणूक योजना, मालमत्ता व्यवहार, करकपात, करसंकलन आणि इतर अनेक आर्थिक व्यवहारांची माहिती विविध माध्यमांतून आयकर विभागापर्यंत पोहोचते. त्यामुळे करदात्याने आपले वार्षिक माहिती विवरण (एआयएस) आणि करदात्याची माहिती सारांश (टीआयएस) नियमितपणे तपासणे आवश्यक आहे. केवळ विवरणपत्र भरताना एकदा माहिती तपासण्याची पद्धत बदलून वर्षभरातील आर्थिक व्यवहारांची वेळोवेळी पडताळणी करणे अधिक योग्य ठरेल.

**उदाहरणार्थ** - बँकेने व्याज जमा केले आहे, पण करदात्याने ते उत्पन्नात दाखविले नाही; - समभाग किंवा सामूहिक गुंतवणूक योजना विकली आहे, पण त्यातून झालेल्या नफ्याचा विचार केला नाही; - मालमत्तेचा व्यवहार झाला आहे, पण त्याचा करपरिणाम तपासला नाही; - करकपात झाली आहे, पण संबंधित उत्पन्नाचा योग्य ताळमेळ घातला नाही. - अशा विसंगती भविष्यात आयकर विभागाकडून विचारणा होण्याचे कारण बनू शकतात.

**३. "माझा कर शून्य आहे" म्हणजे "माझी जबाबदारी शून्य आहे" असे नाही :** अनेक करदात्यांमध्ये असा गैरसमज असतो की, कर देय नसल्यास विवरणपत्र किंवा इतर अनुपालनाकडे लक्ष देण्याची गरज नाही. प्रत्यक्षात कर देयता आणि कर अनुपालन या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. कर भरावा लागत नसला तरी परिस्थितीनुसार उत्पन्नाची योग्य माहिती देणे, आवश्यक असल्यास विवरणपत्र दाखल करणे, करकपातीची माहिती तपासणे, मोठ्या आर्थिक व्यवहारांची कागदपत्रे जतन करणे आणि आयकर विभागाकडून आलेल्या सूचनांना वेळेत उत्तर देणे महत्त्वाचे असते. म्हणून "कर नाही" याचा अर्थ "करविषयक जबाबदारी नाही" असा होत नाही.

**४. प्रत्येक करदात्याने स्वतःची वार्षिक करफाईल तयार करावी :** आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून प्रत्येक करदात्याने स्वतःची एक स्वतंत्र वार्षिक करफाईल ठेवणे अत्यंत उपयुक्त ठरेल. या फाईलमध्ये खालील कागदपत्रे जतन करता येतील - आयकर विवरणपत्राची प्रत, उत्पन्नाची गणना, वार्षिक माहिती विवरण, करदात्याची माहिती सारांश, करकपात प्रमाणपत्रे, बँक खात्यांचे विवरण, व्याज प्रमाणपत्रे, गुंतवणुकीची कागदपत्रे, समभाग आणि सामूहिक गुंतवणूक योजनांची विवरणपत्रे, मालमत्ता खरेदी-विक्रीची कागदपत्रे, गृहकर्जाची कागदपत्रे, भांडवली नफ्याची गणना, परदेशात पाठविलेल्या पैशांशी संबंधित कागदपत्रे, आगाऊ कर भरल्याच्या पावत्या, आयकर विभागाकडून प्राप्त झालेली पत्रे व सूचना आज ही कागदपत्रे डिजिटल स्वरूपात सुरक्षित ठेवणे अधिक सोपे झाले आहे. याचा सर्वांत मोठा फायदा असा की, पुढील वर्षी विवरणपत्र तयार करताना सर्व माहिती सहज उपलब्ध होते आणि भविष्यात आयकर विभागाकडून विचारणा झाल्यास योग्य कागदपत्रांसह उत्तर देता येते.

**५. मालमत्ता व्यवहारांमध्ये करनियोजनाला सर्वाधिक महत्त्व :** घर, सदनिका, जमीन, व्यावसायिक मालमत्ता किंवा पुनर्विकासातील हक्कांची खरेदी-विक्री करताना केवळ व्यवहाराची किंमत पाहणे पुरेसे नाही. मालमत्ता विकण्यापूर्वी खालील प्रश्नांचा विचार करणे आवश्यक आहे - मालमत्ता कधी खरेदी केली? खरेदीची किंमत किती होती? विक्रीची किंमत किती आहे? भांडवली नफा किती होईल? मालमत्तेचे मुद्रांक मूल्य किती आहे? मालमत्ता विक्रीवर करकपात लागू आहे का? मालमत्ता वारशाने मिळाली असल्यास पूर्वीची किंमत कशी निश्चित होईल? मालमत्तेवर केलेल्या सुधारणा किंवा इतर खर्चाचा कराच्या दृष्टीने विचार करता येईल का? मालमत्ता व्यवहारात अनेकदा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर कराचा विचार केला जातो. मात्र योग्य पद्धत अशी असावी - प्रथम करनियोजन, नंतर व्यवहार, त्यानंतर योग्य कागदपत्रे. ही पद्धत स्वीकारल्यास अनावश्यक करभार किंवा भविष्यातील वाद टाळण्यास मदत होऊ शकते.

**६. करकपातीच्या नियमांकडे व्यवसायांनी विशेष लक्ष द्यावे :** व्यावसायिक संस्था, कंपन्या, भागीदारी संस्था आणि इतर व्यवसायांमध्ये करकपात हा नियमित अनुपालनाचा भाग आहे. नवीन आयकर कायदा लागू झाल्यामुळे लेखा प्रणाली, वेतन प्रणाली, देयक प्रणाली आणि करकपातीशी संबंधित नोंदी यांचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. **(पूर्वार्ध)** ■

९०९६३३२३५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## डिजिटल जनजागृती


**सीए अभय सगदेव**

# वैयक्तिक माहिती चोरीला गेली तर?

एका संध्याकाळी एका छोट्या दवाखान्याला कळते की, त्याच्या अपाईंटमेंट कॉम्प्युटरमध्ये मॅलवेअर शिरले आहे. रुग्णांची नावे, मोबाईल क्रमांक आणि प्रिस्क्रिप्शन रेकॉर्ड्स उघड होण्याची शक्यता आहे. दुसऱ्या ठिकाणी, शाळेतील एक कर्मचारी विद्यार्थ्यांची माहिती असलेली स्प्रेडशीट चुकीच्या ई-मेलवर पाठवतो. आणखी एका ठिकाणी, ऑनलाईन शॉपिंग वेबसाईटवरील ग्राहकांच्या खात्यांमध्ये अनधिकृत प्रवेश होतो. या घटना वेगवेगळ्या वाटतात; पण त्या एकच प्रश्न निर्माण करतात : वैयक्तिक माहिती धोक्यात आली तर काय होते?

डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ अर्थात डीपीडीपी ॲक्टमध्ये पर्सनल डेटा ब्रीच ही संज्ञा वापरली आहे. पर्सनल डेटा ब्रीच म्हणजे वैयक्तिक माहितीची अनधिकृत प्रक्रिया किंवा वैयक्तिक माहितीचे अपघाती उघड होणे, संपादन, शेअर करणे, वापर, बदल, नाश किंवा माहितीपर्यंतचा प्रवेश गमावणे, ज्यामुळे तिची कॉन्फिडेन्शिअलिटी, इंटेग्रिटी किंवा ॲव्हेलेबिलिटी धोक्यात येते. ही व्याख्या व्यापक आहे. ब्रीच म्हणजे केवळ हॅकिंग नव्हे; त्यामध्ये अपघाती डिस्क्लोजर, अनधिकृत शेअरिंग, माहितीचा नाश किंवा माहितीपर्यंतचा प्रवेश गमावणे यांचाही समावेश होऊ शकतो. हे अधिक चांगले समजण्यासाठी तीन शब्द लक्षात ठेवूया. कॉन्फिडेन्शिअलिटी म्हणजे वैयक्तिक माहिती अनधिकृत व्यक्तींनी पाहू किंवा वापरू नये. इंटेग्रिटी म्हणजे माहिती चुकीच्या पद्धतीने बदलली किंवा खराब झाली नसावी. ॲव्हेलेबिलिटी म्हणजे अधिकृत व्यक्तींना गरज असताना माहिती उपलब्ध असावी. पर्सनल डेटा ब्रीच या तीनपैकी एक किंवा अधिक बाबींवर परिणाम करू शकतो.

उदाहरणार्थ, रुग्णालयातील रुग्णांची यादी बाहेर गेली, तर कॉन्फिडेन्शिअलिटी प्रभावित होते. विद्यार्थ्यांचे गुण अनधिकृत प्रवेशामुळे चुकीचे बदलले गेले, तर इंटेग्रिटी प्रभावित होते. रॅन्समवेअर अटॅकमुळे डायग्नोस्टिक सेंटरला स्वतःचे पेशंट रिपोर्ट उघडता येत नसतील, तर ॲव्हेलेबिलिटी प्रभावित होते. या प्रत्येक परिस्थितीत डेटा प्रिंसिपल म्हणजे ज्या व्यक्तीशी वैयक्तिक माहिती संबंधित आहे ती व्यक्ती, हिला हानी होऊ शकते.



डीपीडीपी ॲक्ट डेटा फिड्युशिअरीवर वैयक्तिक माहितीचे संरक्षण करण्याची जबाबदारी टाकतो. डेटा फिड्युशिअरी म्हणजे वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशा प्रकारे प्रक्रिया करायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था. साध्या भाषेत, एखादी संस्था 'डेटा प्रोटेक्शन हे आमच्या कॉम्प्युटर व्हेंडरचे काम आहे' असे म्हणून जबाबदारी टाळू शकत नाही. जर ती वैयक्तिक माहिती गोळा करते किंवा नियंत्रित करते, तर तिने त्या माहितीचे संरक्षण करण्यासाठी वाजवी सुरक्षा उपाय केले पाहिजेत.

डीपीडीपी रुल्स, २०२५ मध्ये अशा सुरक्षा उपायांची उदाहरणे दिली आहेत. यामध्ये इन्क्रिप्शन किंवा मास्किंगसारखे योग्य संरक्षण, ॲक्सेस कंट्रोल, लॉग्स आणि मॉनिटरिंगद्वारे ॲक्सेसची व्हिजिबिलिटी, डेटा बॅकअप्स, कन्टिन्युइटी मेजर्स, डेटा प्रोसेसर्स सहभागी असतील तर करारातील सुरक्षा उपाय आणि योग्य तांत्रिक व संस्थात्मक उपाय यांचा समावेश होतो. संस्थेचा आकार आणि स्वरूप यानुसार नेमके उपाय बदलू शकतात; परंतु काहीच न करणे जबाबदार वर्तन ठरू शकत नाही. पर्सनल डेटा ब्रीच झाल्यास डेटा फिड्युशिअरीवर संवाद साधण्याच्या जबाबदाऱ्या येतात. त्याने प्रभावित प्रत्येक डेटा प्रिंसिपलला विनाविलंब, स्पष्ट आणि सोप्या भाषेत माहिती दिली पाहिजे. या संप्रेषणात ब्रीचचे स्वरूप, संभाव्य परिणाम, धोका कमी करण्यासाठी घेतली जाणारी पावले, प्रभावित व्यक्तीने स्वतःसाठी घ्यावयाची सेफ्टी स्टेप्स आणि प्रश्नांना उत्तर देऊ शकणाऱ्या व्यक्तीचा संपर्क तपशील दिला पाहिजे.

डेटा फिड्युशिअरीने डेटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडियालाही सूचना दिली पाहिजे. रुल्सनुसार बोर्डला उपलब्ध माहितीच्या आधारे विनाविलंब प्रारंभिक सूचना द्यावी लागते आणि नंतर निश्चित वेळेमध्ये अधिक सविस्तर सूचना द्यावी लागते. यामुळे ब्रीचेच शांतपणे दडपल्या जात नाहीत आणि गंभीर डेटा प्रोटेक्शन फेल्युअर्सबाबत नियामक पातळीवरही माहिती उपलब्ध राहते. एखाद्या नागरिकाने ब्रीच नोटीस मिळाल्यानंतर काय करावे? प्रथम ती नोटीस काळजीपूर्वक वाचा. पासवर्ड उघड झाले असण्याची शक्यता असेल, तर ते तत्काळ बदला. बँकिंग किंवा पेमेंट डेटा संबंधित असेल, तर व्यवहारांवर लक्ष ठेवा. ओळखपत्र प्रभावित असतील, तर गैरवापराबाबत सावध राहा. ब्रीच रिलेटेड सपोर्टच्या नावाखाली आलेल्या संशयास्पद मेसेजेसमधील लिंक्सवर क्लिक करणे टाळा. खरी ब्रीच नोटीस तुम्हाला व्यावहारिक सुरक्षा पावले स्पष्ट करून देणारी असावी.

### दैनंदिन जीवनातील डीपीडीपी

तुम्हाला असा मेसेज येतो की, तुमच्या अकाऊंट डिटेल्स डेटा ब्रीचमध्ये उघड झाल्या असण्याची शक्यता आहे. घाबरू नका; पण दुर्लक्षही करू नका. पासवर्ड बदला, उपलब्ध असल्यास टू फॅक्टर ऑथेंटिकेशन सुरू करा, अकाऊंटवर लक्ष ठेवा आणि संशयास्पद लिंक्सऐवजी संस्थेच्या ऑफिशिअल वेबसाईट किंवा फोन नंबरद्वारे संपर्क करा.

### तुम्हाला माहिती आहे का?

पर्सनल डेटा ब्रीचमध्ये डेलिबरेट हॅकिंगबरोबरच ॲक्सिडेंटल डिस्क्लोजरचाही समावेश होऊ शकतो. वैयक्तिक माहिती असलेली फाईल चुकीच्या व्यक्तीला पाठवली गेली आणि त्यामुळे कॉन्फिडेन्शिअलिटी धोक्यात आली, तर तेही ब्रीच ठरू शकते. ■

sagdeo1@gmail.com

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# बंडखोर हुथींची गोष्ट!

लाल समुद्रात सध्या हुथी बंडखोरांचा हैदोस आहे. बाब अल-मंदाब सामुद्रधुनीतून जाणाऱ्या सौदीच्या तेलजहाजांवर हल्ला करणारे, सौदीचे कथित मित्रराष्ट्र पाकिस्तान आणि तुर्कीएसाठी डोकेदुखी ठरलेले हे हुथी बंडखोर कोण आहेत? मध्यपूर्वेच्या गुंतागुंतीच्या राजकारणात हुथींसारखा बंडखोर गट महत्त्वाचा का आहे? येमेन, हुथी चळवळ, झैदी समुदाय आणि एकूणच टोळ्यांच्या प्रभावातून बाहेर पडू न शकलेल्या इस्लामिक देशांमधील या संघर्षाचा वेध घेऊ.

आज एकमेकांच्या जीवावर उठलेल्या या दोन पक्षांचे एकेकाळी गळ्यात गळे होते. येमेनचा भौगोलिक प्रदेश आणि जमाती, प्रादेशिक व वांशिक युतींच्या गुंतागुंतीमुळे बाह्य आक्रमकाला तिथे पाय रोवणे अशक्य होते आणि आजही आहे. येमेनमधील अल्पसंख्यक झैदी समुदाय शतकानुशतके त्या देशात प्रमुख शक्ती राहिला आहे. इस्लामच्या शिया पंथात, झैदींना सर्वात वेगळे आणि उदारमतवादी मानले जाते. झैदी हे पाचवे इमाम, इमाम झैद इब्न अली यांचे अनुसरण करतात. धार्मिक श्रद्धा आणि प्रथांच्या बाबतीत, झैदींना सुन्नी इस्लामच्या हनफी आणि शफी पंथांच्या जवळचे मानले जाते. ओटोमन साम्राज्याचा भाग असलेल्या येमेनला पहिल्या महायुद्धानंतर स्वातंत्र्य मिळाले आणि त्याचे पहिले शासक झैदी समुदायाचे प्रमुख इमाम याह्या होते. इमाम याह्या यांनी उत्तर येमेनच्या सुन्नीबहुल आदिवासी भागांवर आपल्या राज्याचा विस्तार केला पण, येमेनला जगापासून अलिप्त ठेवले. दरम्यान, सौदी अरेबियाचे संस्थापक इब्न सौद सत्ता विस्तार करत होते. आधुनिक सौदी अरेबियाच्या स्थापनेनंतर अवघ्या दोन वर्षांनी, १९३४ मध्ये सौदी अरेबिया आणि येमेन यांच्यात लहानसं युद्ध झाल्याची नोंद आहे. या युद्धात सौदी अरेबियाने असिर आणि नजरान हे प्रदेश ताब्यात घेतले. झैदी आणि इमाम याह्या हे प्रदेश ऐतिहासिक येमेनचा भाग मानत होते. या लहानशा वाटणाऱ्या युद्धातून, वादाची विषपल्लवी रुजली. काळ बदलला पण परस्परांविषयीचा तिरस्कार कायम आणि जमिनीच्या मालकी हक्काचा प्रश्न अनिर्णीतच राहिला. याह्या यांच्या मृत्यूनंतर, इमाम अहमद यांनी सोव्हिएत युनियन आणि चीनसोबत राजनैतिक संबंध स्थापले. ६० च्या दशकात अरब जगतात सत्तापालट आणि क्रांतीच्या लाटा उसळल्या. इजिप्तचे लष्करी हुकूमशहा गमाल अब्देल नासेर यांनी रेडिओ व्हॉईस ऑफ द अरब्सच्या माध्यमातून संपूर्ण अरब जगात राजेशाहीविरोधात आंदोलन पेटवले. १९६२ मध्ये, येमेनचे इमाम अहमद यांचे निधन होऊन त्यांचा मुलगा इमाम बद्र गादीवर बसला. पण, आठवड्याभरात इजिप्शियन नासेरच्या प्रभावाखाली असलेल्या येमेनी लष्कराने उठाव करून येमेनला प्रजासत्ताक घोषित केले. यानंतर येमेनमध्ये शह-काटशहाचा पट मांडला गेला. झैदी इमाम आणि त्यांचे समर्थक पळून गेले. या झैदी शिया इमामांना कोणी मदत केली? सौदी अरेबियाच्या सुन्नी राजघराण्याने, जे स्वतःला वहाबी इस्लामचा बालेकिल्ला मानत होते, झैदी इमामांच्या संरक्षणासाठी आपला खजिना उघडला. सौदीने येमेनला गृहयुद्धाचे रणांगण बनवले. येमेनी लढवय्यांनी इजिप्शियन सैनिकांना, दुर्गम पर्वतरांगांमध्ये अगदी पिसाळलं. हे युद्ध नासेरसाठी 'इजिप्तचे व्हिएतनाम' ठरले. यावेळी सौदीने झैदींना भरपूर निधी, शस्त्रे आणि परदेशी भाडोत्री सैनिक पुरवले. इजिप्तला नामोहरम करताना त्यांनी एका दहशतवादी संघटनेला जन्म दिला. ७० च्या दशकात आजच्या हुथींचे पूर्वज आणि सौदी अरेबिया इजिप्तच्या सैन्याविरुद्ध एकाच झेंड्याखाली लढत होते. दरम्यान, उत्तर येमेनच्या सादा प्रदेशात, हुसेन बदरेद्दीन अल-हुथी यांच्या नेतृत्वाखाली झैदींनी एका धार्मिक आणि राजकीय चळवळीला आकार दिला. नेत्याच्या नावाने या गटाला हुथी म्हटले गेले. हुथींनी आरोप केला की, येमेनी सरकार सौदी अरेबियाच्या पाठिंब्याने येमेनमध्ये कट्टर वहाबी आणि सलाफी विचारसरणीचा प्रसार करून झैदी अस्मितेला धोका निर्माण करत आहे. २००९ दरम्यान, राष्ट्राध्यक्ष सालेह यांचे सरकार आणि उत्तर सीमेवरील हुथी बंडखोरांमध्ये सहा युद्धे झालीत. या सर्व युद्धांमध्ये सौदी अरेबियाने सालेह सरकारला पाठिंबा दिला. २००९ मधील सहाव्या युद्धात सौदी अरेबियाचे सैन्य थेट लढाईत उतरले. सौदी सैन्याने हुथींच्या ठिकाणांवर हल्ला केला, परंतु येमेनच्या खडकाळ पर्वतांमध्ये हुथींच्या गनिमी युद्धासमोर त्यांना मोठे नुकसान झाले. इराक, सीरिया, लिबिया आणि अलिकडील इराण युद्धाने हे सिद्ध केले आहे की, केवळ हवाई हल्ल्यांनी कधीही निर्णायक विजय मिळवता येत नाही. जेव्हा एखाद्या देशाने येमेनवर दबाव आणण्याचा किंवा हल्ला करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तेथील लोक आपले मतभेद विसरून बाह्य शत्रूविरुद्ध एकजूट दाखवतात. राजकारणात कोणीही कायमचे मित्र किंवा शत्रू नसतात हा मूलमंत्र देणारी सौदी अरेबिया आणि हुथींची ही कहाणी! ■

९२२३७००२७७

### भव्य मूर्तीपेक्षा सुरक्षित गणेशोत्सव महत्त्वाचा

अलिकडेच दोन ठिकाणी गणेशमूर्ती पडून त्यातून हानी झाल्याच्या घटना समोर आल्या. अशा घटना केवळ अपघात म्हणून विसरून जाण्यापेक्षा त्यातून आपण काही शिकण्याची गरज आहे. मूर्ती जितकी भव्य आणि उंच, तितकी तिची उभारणी, वाहतूक, प्रतिष्ठापना आणि सुरक्षितता यांची जबाबदारीही अधिक वाढते.



गणरायाला उंच आसनावर बसवणे ही श्रद्धा असू शकते; मात्र त्या उंचीमुळे जर सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असेल, तर आपण विचार करायला हवा. ईश्वराला नेमके काय हवे आहे, याचा विचार केवळ मनात करून उपयोग नाही; तो विचार आपल्या कृतीत उतरला पाहिजे. श्री गणेशाला बुद्धी आणि विवेकाची देवता मानले जाते. त्यामुळे गणेशोत्सवात विवेकाचा वापर करणे, सुरक्षिततेला प्राधान्य देणे आणि अनाठायी उंचीच्या स्पर्धेतून बाहेर पडणे, हीच गणरायाच्या शिकवणीला साजेशी कृती ठरेल.

'मूर्ती उंच असावी' यापेक्षा 'उत्सव सुरक्षित असावा',
'देखावा भव्य असावा' यापेक्षा 'विचार भव्य असावेत'
आणि 'स्पर्धा मोठी असावी' यापेक्षा 'भक्ती आणि संस्कार मोठे असावेत',

हा विचार आपण स्वीकारण्याची वेळ आली आहे.

गणेशोत्सव हा आनंदाचा, श्रद्धेचा आणि मांगल्याचा उत्सव आहे. त्यामुळे कोणत्याही भक्ताला, कार्यकर्त्याला किंवा नागरिकाला हानी पोहोचेल अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, याची काळजी घेणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

## वाचक पत्रे

### ज्येष्ठा गौरी पूजन, स्त्रियांचे स्वातंत्र्य आणि माहेरपण

महाराष्ट्रात भाद्रपद महिन्यात गणेशोत्सवादरम्यान महालक्ष्मी म्हणजेच ज्येष्ठा आणि कनिष्ठा या दोन गौरींचे आगमन होते. या सणाचे महाराष्ट्रीयन संस्कृतीत खूप मोठे स्थान आहे. अध्यात्मात महालक्ष्मी हे आदिशक्तीचे (प्रकृतीचे) रूप मानले जाते. 'ज्येष्ठा' ही समृद्धी, स्थैर्य आणि ज्ञानाचे प्रतिनिधित्व करते, तर 'कनिष्ठा' ही क्रियाशक्ती व उत्पत्तीचे प्रतीक आहे. या दोन्ही शक्ती एकत्र आल्याशिवाय घरात किंवा आयुष्यात परिपूर्णता येत नाही. हा सण प्रामुख्याने स्त्रियांचा सण म्हणून उत्साहाने साजरा केला जातो.

पौराणिक समजुतीनुसार, 'ज्येष्ठा' हिला काही ठिकाणी अलक्ष्मी (दारिद्र्य) मानले गेले आहे, परंतु पूजनाच्या दिवशी तिचे आदरपूर्वक स्वागत करून, तिचे समाधान करून तिला शांत केले जाते. महालक्ष्मीने असुरांचा संहार करून जगाला आणि स्त्रियांना सुखी केले. त्यामुळे या दोन गौरींचे रक्षणकर्त्या आणि सुख-समृद्धी देणाऱ्या देवी म्हणून पूजन केले जाते. हा उत्सव मुख्यत्वे तीन दिवसांचा असतो;

**पहिला दिवस (अनुराधा नक्षत्र) आगमन :** घराच्या उंबरठ्यावरून गौरींच्या पावलांचे ठसे काढून, हळद-कुंकवाने स्वागत करून गौरींचे घरात आगमन केले जाते.

**दुसरा दिवस (ज्येष्ठा नक्षत्र) पूजन व महानैवेद्य :** या दिवशी गौरींची षोडशोपचार पूजा केली जाते. पुरणपोळी, १६ प्रकारच्या भाज्या, मेतकूट, लाडू यांचा महानैवेद्य दाखवला जातो. सायंकाळी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम व जागरण (गाणी, खेळ) होते.

**तिसरा दिवस (मूळ नक्षत्र) विसर्जन :** तिसऱ्या दिवशी उत्तरपूजा करून, नैवेद्य दाखवून गौरींचे थाटामाटात विसर्जन केले जाते. शहरी भागात किंवा काही विशिष्ट घराण्यांमध्ये पितळ, मडके (सुगड), माती किंवा धातूचे मुखवटे वापरून उभ्या गौरी (मानवी रूपात) सजवल्या जातात. तसेच अनेक ठिकाणी नदीकाठचे किंवा शेतातले खडे आणून त्यांची गौरी म्हणून स्थापना केली जाते. तर काही ठिकाणी धान्याच्या ताटांवर गौरींची स्थापना होते. या सणामुळे कुटुंबात आणि समाजात मांगल्याचे, उत्साहाचे व परस्पर स्नेहाचे वातावरण निर्माण होते. पूर्वीच्या काळात स्त्रियांना स्वतःची मते मांडण्याचे किंवा एकत्र येण्याचे स्वातंत्र्य कमी असे. गौरी पूजन हे स्त्रियांसाठी 'माहेरपणाचा सण' समजला जातो. या तीन दिवसांत स्त्रिया एकत्र येतात, गाणी म्हणतात (उदा. गौरीची गाणी, झिम्मा, फुगड्या). जागरण करून रात्रीच्या वेळी आपले सुख-दुःख गाण्यांच्या माध्यमातून व्यक्त करतात. हा एकप्रकारे स्त्रियांच्या मानसिक ताणतणावावर उपाय म्हणून कार्य करतो. गौरी उत्सव हा केवळ एक धार्मिक विधी नसून निसर्गाविषयीची कृतज्ञता, स्त्रीशक्तीचा सन्मान आणि कौटुंबिक एकोप्याचा एक महान सांस्कृतिक ठेवा आहे. ■

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त...

### कृषी व्यवसायिक धर्मराज चावरे यांना 'मराठवाडा रत्न पुरस्कार



तभा. वृत्तसेवा

अहमदपूर दि. १८ सप्टेंबर : येथील सोनालिका ट्रॅक्टर व ट्रेलर्सचे संचालक, युवा उद्योजक धर्मराज चावरे यांना कृषी व्यावसायिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित शानदार पुरस्कार सोहळ्यात प्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते 'मराठवाडा रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत गेल्या ३१ वर्षांपासून शेतकरी आणि शेतीला पूरक यंत्रसामग्रीच्या क्षेत्रात चावरे यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन कृषी यांत्रिकीकरणाला चालना देण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

धर्मराज चावरे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी मंत्री विनायकराव पाटील, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके पाटील, माजी आमदार बब्रुवाहन खंदाडे, नगराध्यक्ष स्वप्निल हत्ते, उपनगराध्यक्ष आयाज शेख, शिवकुमार सोनटक्के, गुंडप्पा तत्तापुरे, ओम भाऊ पुणे, राम तत्तापूरे, धनराज चावरे, ज्ञानोबा बडगीरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# पाणी टंचाईच्या आढावा बैठकीत पीक,पाणी, चाऱ्यांवर चर्चा

## औसा मतदारसंघातील परिस्थितीबाबत आमदार अभिमन्यू पवारांनी मांडली व्यथा

तभा वृत्तसेवा

औसा दि.१८ सप्टेंबर : अपुरा पाऊस, खरीप पिकांचे नुकसान आणि आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यातील पाणी व चारा उपलब्धतेसह पीक परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.या बैठकीत आमदार अभिमन्यू पवार यांनी ओसा मतदारसंघातील भीषण परिस्थिती मांडून चर्चा केली.

सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक झाली. आमदार विक्रम काळे, आमदार संजय बनसोडे यांनी दूरदृश्य प्रणाली द्वारे सहभाग घेतला.जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील,कृषी व पशुसंवर्धन सभापती कविता गोरे, महानोर जयश्री सोनकांबळे,



जिल्हाधिकारी डॉ.भारत बास्टेवाड अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, महापालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक अमोल तांबे व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत औसा मतदारसंघातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, उपलब्ध जलसाठा, संभाव्य पाणीटंचाई तसेच पशुधनासाठी उपलब्ध चारा याबाबत आमदार अभिमन्यू पवार यांनी सविस्तर माहिती मांडली. आगामी काळात पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन, जलवाहिन्यांची दुरुस्ती तसेच पाण्याचा अपव्यय व अवैध उपसा रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता त्यांनी बैठकीत मांडली. पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत जनजागृती करण्यावरही त्यांनी भर दिला.

पावसाचे प्रमाण कमी असल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे पीक कापणी प्रयोगात नुकसानीची वस्तुस्थिती अचूकपणे नोंदवून शासनाकडे अहवाल सादर करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे सूक्ष्म नियोजन आतापासूनच करण्याच्या सूचना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिल्या. संभाव्य टंचाई लक्षात घेऊन प्रशासनाने पूर्ण तयारी ठेवावी, तसेच गावागावांत पाणीटंचाई निर्माण झाल्यास तातडीने उपाययोजना करून पाणीपुरवठा सुरू करावा, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

### अवैध उपसा रोखण्यासाठी कारवाईचे निर्देश

जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पातील पाणी साठा पिण्यासाठी आरक्षित करण्यात आला असून त्याचा उपसा रोखण्यासाठी विशेष पथके गठित करून सातत्याने कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले आहेत.तसेचमांजरा धरणातून होणारा अवैध उपसा व लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यातून होणारी पाणी चोरी रोखण्यासाठी महापालिका, महावितरण, पोलीस व महसूल विभागाने संयुक्त मोहीम राबवावी.असे त्यांनी यावेळी सांगितले.

### भोजराजनगर शाळेत २५० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी गरजू लाभार्थ्यांना चष्म्यांचे वाटप



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १८ सप्टेंबर : विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोजराजनगर येथे मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिर उत्साहात पार पडले. सुरज दादा चव्हाण, प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या सौजन्याने तसेच शिवश्री फाउंडेशन व शिवश्री व्हिजन केअर सेंटर, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात तब्बल २५० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीत आवश्यक असलेल्या ४ लाभार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना डोळ्यांची निगा, नियमित नेत्र तपासणी आणि दृष्टीशी संबंधित समस्या उद्भवल्यास वेळेत उपचार घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमास शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुजाता बरबटले, उपाध्यक्ष संदिप धुमाळे, सौ. दिपाली कांबळे, मुख्याध्यापक परमेश्र्वर तोंडारे, नगरसेवक सुधीर लखनगावे तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते शिवशंकर होनमाने, नंदू तांबोळकर, जनक बिरादार, रुद्रा जळकोटे, अंगद शेंडगे, श्रीकांत कदम यांच्यासह कार्यकर्ते व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे आरोग्य हीच त्यांची उज्वल भविष्यासाठीचे खरे भांडवल आहे. शाळेच्या माध्यमातून अशा आरोग्यविषयक उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे, असे मत शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष संदिप धुमाळे यांनी व्यक्त केले. तसेच शिबिराच्या आयोजनासाठी सुरज दादा चव्हाण, शिवश्री फाउंडेशन आणि शिवश्री व्हिजन केअर सेंटरचे त्यांनी आभार मानले.

### परिस्थितीचे भांडवल न करता त्यावर मात करण्यासाठी प्रयत्न करावा : प्राचार्य डॉ. पौळ

## महाराष्ट्र महाविद्यालयात पालक-शिक्षक समन्वय सभा संपन्न

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १८ सप्टेंबर : महाविद्यालय हा समाज विकासाचा एक महत्त्वाचा घटक आहे. महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या भोतिक सुविधा, गुणी शिक्षक यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. नितीवान पिढी घडते. महाविद्यालयात होत असलेल्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होतो. आज ग्रामीण भागातील परिस्थिती निसर्गाच्या लहरीपणामुळे फार बिकट बनली आहे, यातूनच आर्थिक,सामाजिक, शैक्षणिक समस्या निर्माण झाल्या आहेत. परंतु अशा परिस्थितीचे भांडवल न करता त्यावर मात करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, असे मत महाराष्ट्र औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ यांनी व्यक्त केले.



निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात आयोजित शिक्षक-पालक समन्वय सभेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपलं ध्येय निश्र्चित करावे व त्या दिशेने वाटचाल करावी, त्या वाटचालीत येणाऱ्या अडचणी आपले पालक व शिक्षक यांच्या समन्वयावातून सोडवाव्यात. जिथे ज्ञान मिळेल त्यांच्या संपर्कात जाऊन आपलं नेटवर्क ॲक्टिव्ह करून घ्यावं असा सल्लाही त्यांनी दिला. महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष पाटील निलंगेकर, सचिव सरतापे यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्यात.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम होते. अध्यक्ष समारोपात त्यांनी महाविद्यालयात होत असलेल्या विविध उपक्रमाबाबत माहिती दिली. कौशल्यावर आधारित शिक्षण पद्धती असल्यामुळे पुस्तकी ज्ञानाबरोबरच विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करून घ्यावीत, त्यासाठी त्यांनी वर्गात आले पाहिजे. पालकांचीही ही महत्त्वाची जबाबदारी आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड यांनी या समन्वय सभेत मनोगत व्यक्त करताना, पालकांनी आपल्या घरातील वातावरण तणावमुक्त ठेवावे, अपयश मिळालं तर आपल्या पाल्याला समजून सांगावे व त्याचा आत्मविश्र्वास वाढवावा, तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल महत्त्वाचा असला तरी त्याचा वापर ज्ञानार्जनासाठीच करावा, आपल्या पाल्याच्या प्रगतीबद्दल महाविद्यालयात येऊन प्राचार्य किंवा शिक्षकांशी संवाद साधावा अशा विविध मुद्द्यावर आपले मत व्यक्त केले. काही पालकांनीही आपल्या प्रतिक्रिया यात व्यक्त केल्यात त्यातून महाविद्यालयातून मिळणाऱ्या विविध सुविधा व शिक्षणाबद्दल समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नुकत्याच जाहीर केलेल्या गुणवत्ता यादीत महाविद्यालयातील नऊ विद्यार्थ्यांचा समावेश आहे त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक- पालक समन्वय समितीचे समन्वयक प्रा. शिवरुद्र बदनाळे यांनी केले, सूत्रसंचालन कु. अंकिता मुळे व कु. अंकिता आगलावे यांनी तर आभार प्रा. संदीप सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. रवींद्र मदरसे, प्रा. संदीप सूर्यवंशी, प्रा. विकास खरात, प्रा. अभिमन्यू गंगाजी यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमासाठी विविध शाखेतील विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### समाज संघटन काळाची गरज : संजय विभूते

तभा वृत्तसेवा

उदगीर, दि. १८ सप्टेंबर : कोल्हापूरच्या ऐतिहासिक भूमीत २३ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र प्रांतिक तेलिक महासभेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य राज्यस्तरीय समाज मेळावा संपूर्ण महाराष्ट्रातील समाज बांधवांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यशस्वी झाला.

या मेळाव्याबद्दल समाज बांधवांचे प्रत्यक्ष आभार मानण्यासाठी मेळाव्याचे संयोजक, महाराष्ट्र प्रांतिक तेलिक महासभेचे उपाध्यक्ष तथा शिवसेना शिंदे गटाचे सांगली जिल्हाप्रमुख संजय विभूते व पश्र्चिम विभागीय उपाध्यक्ष राजाभाऊ लोखंडे व प्रवीण मुखेडकर (खढ एपस.) यांनी कृतज्ञता व आभार दौरा आयोजित केला आहे. या दौऱ्यादरम्यान रविवारी उदगीरमध्ये आगमन झाल्यानंतर महाराष्ट्र प्रांतिक तेलिक महासभा व तेली समाजाच्या वतीने विशेष अतिथी शनि देव मंदिर, उदगीर येथे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना संजय विभूते म्हणाले की, समाज संघटित असेल तरच समाजाच्या समस्या प्रभावीपणे सोडविता येतात. त्यामुळे समाज संघटन ही काळाची गरज आहे.

कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय मेळाव्याला संपूर्ण महाराष्ट्रातून समाज बांधवांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा समाजाच्या एकजुटीचे आणि ताकदीचे दर्शन घडविणारा होता. ते पुढे म्हणाले, आपल्या अथांग उत्साहामुळे आणि अभूतपूर्व उपस्थितीमुळे कोल्हापूर येथील राज्यस्तरीय मेळावा प्रचंड यशस्वी झाला. या मेळाव्याचे खरे शिल्पकार संपूर्ण महाराष्ट्रातील समाज बांधव आहेत. आपल्या अफाट प्रतिसादाबद्दल आभार मानण्यासाठी शब्द अपुरे पडतात.

हा केवळ मेळावा नव्हता, तर समाजाच्या वज्रमुठीचे आणि एकतेचे दर्शन होते. याच प्रेमाचा स्वीकार करण्यासाठी आणि समाज बांधवांचे प्रत्यक्ष आभार मानण्यासाठी आपण आभार दौऱ्याच्या माध्यमातून विविध ठिकाणी भेटी देत असल्याचे त्यांनी सांगितले.

एकच ध्यास... समाजाची एकजूट! एकच संकल्प... तेली समाजाची ताकद! गट-तट विसरून एकत्र येऊया आणि समाजाची ताकद दाखवूया, असे आवाहनही संजय विभूते यांनी यावेळी केले.

कार्यक्रमात उपस्थित राजेश चिल्लरगे, महाराष्ट्र प्रांतिक तेलिक महासभा लातूर जिल्हा सचिव तसेच इतर मान्यवर शिवशंकर चिल्लरगे, ओम विश्र्वनाथे, सुरेश चौधरी, कुमार विश्र्वनाथे, बाबुराव चिल्लरगे, अशोक हुडगे, चंद्रकांत भद्रशेट्टे, कुमार चौधरी, शंकर विश्र्वनाथे, ॲड. सोमेश्र्वर राऊत, सुभाष बडीहवेली, भद्रू चौधरी, गंगाधर बडीहवेली, उमाकांत गुडले, सोमनाथ चिल्लरगे यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी व तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार चिल्लरगे यांनी केले, तर आभार व्यक्त अमर खेडे यांनी मानले.

## माहेश्वरी समाजात ऋषी पंचमी राखी बंधन उत्साहात

### राखी बांधण्याची वर्षानुवर्षांची अनोखी परंपरा; प्रेम, आपुलकी आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १८ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात माहेश्र्वरी समाजाची भाऊ-बहिणीच्या अतूट प्रेमाची परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडली. गणेश चतुर्थीला गणरायाचे आगमन झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी समाजबांधव एकत्र येऊन राखी बंधनाचा सण साजरा करतात. वर्षानुवर्षे जपली गेलेली ही परंपरा केवळ राखी बांधण्यापुरती मर्यादित नसून, नात्यांमधील प्रेम, विश्र्वास, जिव्हाळा आणि सामाजिक एकोपा अधिक दृढ करणारी ठरत आहे.

माहेश्र्वरी समाजातील महिला आपल्या भावाच्या मनगटावर प्रेमाने राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची, सुख-समृद्धीची कामना करतात. तर भाऊही बहिणीच्या सुख-दुःखात सदैव सोबत राहण्याचे आणि तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्र्वासन देतो. त्यामुळे राखीचा हा धागा केवळ मनगटावर बांधला जात नाही, तर तो आयुष्यभराच्या प्रेमाची, विश्र्वासाची आणि आपुलकीची गाठ अधिक घट्ट करतो.

ऋषी पंचमीच्या निमित्ताने सप्तर्षींचे स्मरण आणि पूजन करण्याची धार्मिक परंपरा असताना, याच कालखंडात माहेश्र्वरी समाजातील राखी बंधनाची परंपरा नात्यांना नव्याने उजाळा देणारी ठरते. आधुनिक जीवनशैलीमुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण होत असताना अशा परंपरांमुळे कुटुंबातील सदस्य तसेच समाजबांधव एकत्र येतात आणि आपुलकीचे बंध अधिक मजबूत होतात.

या उत्सवासाठी समाजातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक-युवती तसेच लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले. बहिणींनी भावांना राखी बांधली, औक्षण केले आणि त्यांच्या सुखी व निरोगी आयुष्यासाठी ईश्र्वरचरणी प्रार्थना केली. भावांनीही बहिणींना प्रेम, सन्मान आणि सुरक्षिततेची भावना देत त्यांच्या प्रत्येक सुख-दुःखात सहभागी होण्याचा संकल्प व्यक्त केला.

चार-पाच दशकांपासून ही परंपरा पाहणाऱ्या ज्येष्ठांच्या मते, काळ बदलला, जीवनशैली बदलली; मात्र राखीच्या या धाग्यातील प्रेम आणि आपुलकी आजही तितकीच घट्ट आहे. गणरायाच्या आगमनानंतर समाजातील प्रत्येक घरात आणि कुटुंबात निर्माण होणारे हे आनंदाचे वातावरण माहेश्र्वरी समाजाच्या एकजुटीचे आणि संस्कृतीशी असलेल्या नात्याचे सुंदर दर्शन घडवते.

# लेखी आश्वासनानंतर भादेकरांचे आमरण उपोषण स्थगित

## शिक्षण विभागाचा पुढाकार उपोषणाला तिसऱ्या दिवशी यशकन्या प्रशाला आणि जिल्हा परिषद शाळा स्वतंत्रच विघ्नहर्त्यांच्या आरतीने उपोषणाची सांगता

तभा वृत्तसेवा

औसा दि.१८ सप्टेंबर : उपोषण कर्तव्यांची केलेल्या मागण्या पुर्णपणे मान्य करून जिल्हा परिषद कन्या माध्यमिक शाळा व जिल्हा परिषद माध्यमिक प्रशाला या दोन्ही शाळांच्या एकत्रिकरणाचा अधिकृत निर्णय झाला नाही.आजही या दोन्ही शाळा स्वतंत्रच आहेत.शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन न करता जी शाळा पाडण्यात आली. त्यात अनियमितता आढळून आली असून या तक्रारीची चौकशी तक्रारदारांना सोबत घेऊन करण्यात येईल. तोपर्यंत चालू काम ३० सप्टेंबर पर्यंत स्थगित करण्यात येईल.असे गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांनी लेखी आश्र्वासन यावेळी देवून विघ्नहर्ता श्री गणेशाची आरती करून राम पाटील यांचे आमरण उपोषण सोडविले आहे.तसेच शाळा पाडकाम करताना विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था केली नाही. ती लगेच संबंधित एजन्सीने स्वखर्चाने करावी.असे यावेळी ठरले आहे.



तरुण भारत इफेक्ट

भेटा केंद्रप्रमुख शाम क्षिरसागर व बांधकाम विभागाचे उप अभियंता प्रदिप देवशेटवार , ग्रामपंचायत अधिकारी आर आर शिंदे व गावकरी उपस्थित होते.

तालुक्यातील भादा येथे जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सुरू होती.तर ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी.यासाठीतत्कालिन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा शिक्षण समितीचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांच्या प्रयत्नातून गेल्या २५ वर्षांपासून कन्या माध्यमिक शाळा सुरू करण्यात आली.एका गावात एकाच मैदानावर दोन शाळा असतील तर दोन्ही शाळाचे एकत्रीकरण करावे.असा आदेश राज्य सरकारने दिला. स्वतंत्र मुलींची शाळा असल्याने सुधारलेली मुलींच्या शिक्षणाची गुणवत्तेचे काय होणार.असा प्रश्न मुलींच्या पालकांना पडला. कन्या माध्यमिक शाळा स्वतंत्र असावी अशी ग्रामपंचायत कार्यालयाकडे मागणी केली.ग्रामपंचायत कार्यालयाने ठराव मंजूर केला. आणि ग्रामसभेत ठराव मंजूर करण्यात आला.याचबरोबशालेय व्यवस्थापन समितीने ठराव मंजूर करून स्वतंत्र कन्या माध्यमिक शाळेची मागणी केली.तसेच गावात मुलींची स्वतंत्र शाळा असावी.म्हणून गावातील ३५-४०जणांनी घरांची दोन एकर जागा शाळेसाठी दानं देऊन शाळेच्या नावाने केली.केवळ मुलींच्या शाळेसाठी गावकऱ्यांची ओढ पाहून शाळेच्या बांधकामासाठी आमदार रमेश कराड यांनी जिल्हा नियोजन समिती कडून ९०लाख रूपयांचा निधी मंजूर करून घेतला. शाळेच्या बांधकामाचा आदेश निघून कारवाई पुर्ण झाली.

यानंतर गावकऱ्यांनी दान दिलेल्या दोन एकर जागेत कन्या माध्यमिक शाळेचे बांधकाम अपेक्षित असताना जिल्हा परिषद माध्यमिक शाळा त्या कांही वर्ग खोल्या पाडण्यात आल्या. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवून नये.यासाठी कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही. शिवाय शाळेचे शैक्षणिक वेळापत्रक बदलण्यात आले . यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करून रास्ता रोको चा इशारा देण्यात आला होता.पण तांत्रिक कारणांमुळे झाले नाही.यानंतर आमरण उपोषणाचा इशारा देत मंगळवारपासून उपोषणास सुरुवात करण्यात आली.गेली दोन दिवस शिक्षण विभागाच्या वतीने उपोषण स्थळी भेट देऊन चौकशी करण्यात आली.आणि तिसऱ्या दिवशी गटशिक्षणाधिकारी यांनी लेखी आश्र्वासन देत आमरण उपोषण आंदोलन थांबवले आहे. लेखी आश्र्वासनामुळे राम पाटील यांच्या आंदोलनास यश आले आहे.

CMYK


# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## गणेशोत्सवात सामाजिक बांधीलकीतून ७१ हेल्मेटचे वाटप

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा संदेश देत पोलीस स्टेशन गांधी चौक हद्दीतील श्री शिवछत्रपती गणेश मंडळ, मोती नगर यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

तसेच नागरिकांच्या रस्ते सुरक्षेचा विचार करून मंडळाच्या वतीने ५० हेल्मेटचे वाटप करण्यात आले. याच उपक्रमांतर्गत सुवर्णा सराफ गणेश मंडळ, सराफ लाईन यांच्या वतीनेही २१ हेल्मेटचे वाटप करण्यात आले.

पोलीस प्रशासनाच्या वतीने गणेश मंडळांनी उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवावेत तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले होते.

## विविध वृत्त.....

### लातूरमध्ये मोफत कापडी पिशव्यांचे वाटप; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून 'प्लास्टिकमुक्त भारत' अभियानांतर्गत लातूर शहरात पर्यावरण जनजागृतीचा उपक्रम राबविण्यात आला. 'आपले आरोग्य - आपलीच जबाबदारी फाउंडेशन' आणि 'सप्तफेरे मॅट्रिमनी' यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद गेटसमोर नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. प्लास्टिकच्या पिशव्यांचा वाढता वापर पर्यावरणासाठी गंभीर समस्या ठरत आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणाची होणारी हानी लक्षात घेता नागरिकांनी दैनंदिन जीवनात प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर टाळून त्याऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करावा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

'प्लास्टिकला नकार - कापडी पिशवीचा स्वीकार' या घोषवाक्यासह नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. दयानंद गेट परिसरात खरेदीसाठी येणार्या नागरिकांना मोफत कापडी पिशव्या देण्यात आल्या. नागरिकांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत कापडी पिशव्या स्वीकारल्या. पर्यावरणाचे संरक्षण ही केवळ शासन किंवा प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील प्लास्टिकचा वापर कमी करून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमास सीआरपीसी ऑफिसर शिरीषकुमार शेरखाने तसेच वीरभद्र तरगुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीत नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

## लातूर जिल्ह्यात श्री ज्येष्ठा गौरींचे पूजन थाटात संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ सप्टेंबर : संपूर्ण लातूर जिल्ह्यात गुरुवारी श्री ज्येष्ठा गौरींचे सोन्याच्या पाऊलांनी आगमन झाले. तर शुक्रवारी सायंकाळी ज्येष्ठा गौरींची मंगल आरती करून त्यांना पंचपक्वानांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. यावेळी घरोघरी महालक्ष्मीकडेभिषण दुष्काळाचे सावट दूर करुन समाधानकारक पावसासाठी मनोभावे प्रार्थना करण्यात आली.

यावर्षीचापावसाळा संपत आला तरी अद्याप पर्यंत जिल्ह्यात म्हणावा तेवढा पाऊस झालेला नाही. पावसाअभावी पिके करपून जात असून खरीप हंगाम पुरता हातचा गेल्यात जमा आहे. पर्यावरणाच्या असमतोलामुळे यावर्षी पावसाचे प्रमाण जेमतेम राहील असा अंदाज वर्तवला जात होता. त्यातच जागतिक पातळीवर एल निनोच्याप्रभावानेहीदुष्काळसदृश्य वातावरणाचे संकेत देण्यात आले होते. एकंदरच यावर्षीच्या पावसाळ्याच्याप्रारंभापासूनचदुष्काळाची चिन्हे दिसत होती. संभाव्य दुष्काळाच्या सावटाने पिण्याच्या पाण्याचा प्रश्र्न आतापासूनच गंभीर होताना दिसतआहे. पाऊसचनसेल तर संपूर्ण बाजारपेठही ठप्प झाल्याचेपोळा दुष्काळाच्या भीषण छायेतसाजरा झाला. पोळा हा सण शेतकरी बांधवांसाठी अत्यंत महत्वाचा असतो. वर्षभर आपल्या शेतात काबाडकष्ट करणाऱ्या बैलांना शेतकरी खांदेमळणीच्या दिवशी न्हाऊ माखू घालून पोळ्यादिवशी पुरणपोळी खायला घाला असतो. पण, यावर्षी दुष्काळाच्या छायेतचहा सण साजरा झाला. पोळ्यानंतर आलेल्या श्री गणरायाचे स्वागत उत्साहात करण्यात आले. पण त्या उत्साहावरहीदुष्काळाची छाया दिसून आली. त्यानंतर श्री महालक्ष्मी अर्थात ज्येष्ठा गौरीचा सण साजरा करण्यात येत आहे. ज्येष्ठा गौरींचासणहीप्रतिवर्षी उत्साहपूर्ण वातावरणात साजराहोतो. यावर्षी दुष्काळामुळे बाजारात आधीच महागाई वाढल्याने खरेदीसाठी गृहिणींवर



मर्यादा आल्याचे दिसून आले. गौरींच्या मुखवट्यासहसजावटीच्या सामग्रीचे दरातही वाढ झाल्याने अनेकांना त्यासाठी हात आखडता घ्यावा लागल्याचे दिसत होते.महालक्ष्मीच्या उत्सवासाठी घरोघर अगदी दिवाळीसारखी तयारी केली जाते. महालक्ष्मीच्या समोर मांडण्यात येणाऱ्या आरासीतसर्व प्रकारची मिष्टाने, मिठाई, आकर्षक खेळणी ठेवण्यात येतात. त्यासाठी गृहिणी अनेक दिवसांपासून पूर्वतयारी करत असतात. गौरींच्या आगमनाच्या पार्श्र्वभूमीवर घरात आकर्षक मखर सजवलेजाते. त्यामध्ये विद्युत रोषणाई करून शोभिवंत केले जाते. भारतीय संस्कृतीतमहालक्ष्मीच्या सणाचे एक आगळे वेगळे वैशिट्यआहे. सर्वच हिंदू परिवारातहा सण अतिशय श्रद्धेने साजरा केला जातो. ग्रामीण भागात तर या सणाचे औचित्य साधून महिला भगिनी एकमेकींच्या घरी जाऊन गौरींचे दर्शन व देखावेपाहण्यासाठी गर्दी करताना आढळून येतात. शहरातहीमागच्या वीस वर्षांपूर्वी हीच प्रथा होती. पण, मागच्या कालखंडात आलेल्या फ्लॅट संस्कृतीमुळे एकमेकींच्या घरी जाऊन गौरी - देखावेपाहण्याचेप्रमाण काहीसे कमी झाले आहे. तरीही अनेक महिला भगिनी एकमेकींना आग्रहाने त्यासाठी निमंत्रित करताना दिसतात. ज्येष्ठा गौरींनाचमहालक्ष्मी म्हणूनहीओळखले -पुजले जाते. महालक्ष्मीसाठी सोळा भाज्यांसह पंचपक्वानांचा प्रसाद तयार केला जातो. पूर्वी सोळा भाज्या स्वतंत्ररित्या केल्या जायच्या. मात्र, आता सगळ्या भाज्या थोड्या थोड्या अशा एकत्रित करूनच शिजवून त्यांचा नैवेद्यात समावेश केला जातो. शुक्रवारी सायंकाळी घरोघरी महालक्ष्मीची मंगला आरती झाल्यानंतर त्यांना पंचपक्वानाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. दुष्काळाचे सावट असल्याने भाज्यांसह फळे, फुले अगदी नैवेद्यासाठी आवश्यक असणाऱ्या केळीच्या पानाच्या किमतीतही भरीव वाढ झाल्याचे दिसून आले. केळीचे पान दहा ते वीस रुपयांना एक याप्रमाणे विकले जात होते. यावरून यावर्षीच्या महागाईची कल्पना येऊ शकते. तरीही महागाईच्या सावटाखाली का असेना पण महालक्ष्मी, ज्येष्ठा गौरीचा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

## राजकरणी आणि पत्रकार एकाच नाण्याच्या दोन बाजू : शिवेंद्रसिंहराजे भोसले

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या 'लातूर भूषण' पुरस्कारांचे शानदार कार्यक्रमात वितरण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : पत्रकारिता ही समाजाचा आरसा असून त्यात सत्याचे प्रतिबिंब उमटणे गरजेचे आहे. अर्धवट अथवा चुकीच्या माहितीच्या आधारे बातम्या देण्यापेक्षा सत्यता पडताळून, सखोल शहानिशा करून तथ्य समाजासमोर मांडावे. खरे तर पत्रकार आणि राजकारणी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे पत्रकारांनी विकासकामांना सकारात्मक दिशा देणारी भूमिका बजावावी, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या जिल्हा शाखा लातूरच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून 'लातूर भूषण' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे तर स्वागताध्यक्ष म्हणून आमदार अभिमन्यू पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, महापौर जयश्रीताई सोनकांबळे, प.पू. श्री विद्यानंद सागर महाराज, जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड, जी. प. मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे आदी उपस्थित होते. समाजसेवा, शिक्षण, प्रशासन, कला-संस्कृती-साहित्य, उद्योग व सहकार, वैद्यकीय सेवा, महिला सक्षमीकरण, पत्रकारिता तसेच अध्यात्म आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या कार्याचा गौरव यावेळी करण्यात आला.यावेळी पालकमंत्री भोसले म्हणाले की, पत्रकार आणि राजकारणी यांचा अंतिम उद्देश समाज हितासाठी काम करणे आणि विकासाला गती देणे हा असतो. त्यामुळे पत्रकारांनी लोकप्रतिनिधींची भूमिका, पार्श्र्वभूमी आणि वस्तुस्थिती समजून घेऊन बातमी मांडावी. एखाद्या व्यक्तीची प्रतिमा केवळ अर्धवट माहितीच्या आधारे मलीन करण्यापेक्षा संपूर्ण वस्तुस्थिती जाणून घेऊन तथ्य समाजासमोर ठेवले, तर पत्रकारितेच्या धर्मालाच खरी प्रतिष्ठा प्राप्त होईल, असे त्यांनी नमूद केले.

स्वागताध्यक्ष आमदार अभिमन्यू पवार यांचा मिश्कील शैलीत उल्लेख करताना पालकमंत्री भोसले यांनी उपस्थितांमध्ये हास्याची लहर निर्माण केली. ते म्हणाले, आपले औशाचे आमदार अभिमन्यू पवार हे महाभारतातले अभिमन्यू नाहीत. ते चक्रव्यूहात अडकणारे नव्हे, तर चक्रव्यूहात अडकवणारे अभिमन्यू आहेत. त्यांच्या आग्रह आणि पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांच्या पाठपुराव्यामुळे आपण या कार्यक्रमाला वेळ देऊ शकलो, असे सांगत भोसले यांनी आमदार पवार यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचे कौतुक केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांनी पुरस्कार वितरणामागील भूमिका स्पष्ट केली. समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देणे आणि पुढील वाटचालीस बळ देणे, हा पुरस्कारामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार समाजप्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. मात्र समाजाला योग्य दिशा देण्यात साधुसंत, महाराज आणि विविध क्षेत्रांतील प्रबोधनकारांचेही मोठे योगदान आहे. त्यामुळे पत्रकारांनी केवळ राजकीय घडामोडींना प्रसिद्धी देण्यापुरते मर्यादित न राहता साधुसंत, महाराज यांच्या विचारांना आणि समाजप्रबोधनाच्या कार्यालाही व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे. त्यांच्या विचारांचा प्रकाश समाजाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवून प्रबोधनाची समृद्ध परंपरा पुढे नेण्याचे काम पत्रकारांनी करावे, असे आवाहन भोकरे यांनी केले. सूत्रसंचालन यु. डी. गायकवाड आणि सुशील सूर्यवंशी यांनी केले तर आभार अशोक हनवते यांनी मानले.

## संत गोपाळ बुवा साखर कारखान्याचे बॉयलर अग्नी प्रदीपन

### शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करणार : चेअरमन कराड

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : ऊस उत्पादक शेतकऱ्याची हित डोळ्यासमोर ठेवून नव्याने उभ्या राहिलेल्या संत श्री गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदिपन दुष्काळी परिस्थिती पाहता १७ सप्टेंबर २०२६ रोजी अत्यंत साध्या पद्धतीने करण्यात आले. येत्या घटस्थापने दिवशी गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात येणार असून शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक केली जाईल अशी ग्वाही कारखान्याचे चेअरमन राजेश कराड यांनी यावेळी दिली.



हक्काचा साखर कारखाना व्हावा हे असंख्य शेतकऱ्यांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरले. लातूर तालुक्यातील मौजे रामेश्र्वर परिसरात दिमाखाने उभा असलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. या साखर कारखान्याचा दुसरा बॉयलर अग्नी प्रदीपन गुरुवार १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता कारखान्याचे प्रवर्तक श्री. तुळशीराम अण्णा कराड, प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड, सौ. कौशल्या कराड, कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, सौ. शुभांगी कराड, रणविर कराड, देव कराड यांच्यासह अनेक मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावर्षी पावसाचे अत्यल्प प्रमाण झाल्याने बॉयलर अग्निपदीपन अत्यंत साध्या पद्धतीने करण्यात आला. तत्पूर्वी श्री. बालासाहेबतात्या कराड आणि त्यांच्या सुविद्यपत्नी सौ. आशाताई कराड यांच्या शुभहस्ते विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी कारखान्याचे भागधारक, ऊस उत्पादक, शेतकरी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राजेश कराड म्हणाले की, गेल्या वर्षी सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सहकार्याने एक लाख ३५ हजार टन उसाचे गाळप करण्यात आले. आज बॉयलर अग्नी प्रदीपन करण्यात आले. कारखान्याच्या गाळप क्षमते बरोबरच गळीत हंगाम पूर्वतयारी पूर्ण झाली असून येत्या ११ ऑक्टोबर २०२६ घटस्थापने दिवशी या साखर कारखान्याचा प्रत्यक्ष गळीत हंगाम सुरू करण्यात येणार आहे. येणाऱ्या काळातील हंगामात ११ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर दरम्यानच्या ऊसाला ३१५१, एक डिसेंबर ते १५ जानेवारी दरम्यानच्या उसाला प्रति टन ३२५१, आणि १५ जानेवारी नंतर येणाऱ्या ऊसाला ३३५१ रुपयाचा भाव देण्यात येणार आहे. सदरील भाव दोन टप्प्यात असून पहिली उचल २८०० रुपये असेल उर्वरित रक्कम दोन टप्प्यात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल असे बोलून दाखवले.

## पालकमंत्री भोसले यांच्या हस्ते मुख्याध्यापक गणेश राणबा सावळकर यांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा, ता. रेणापूर, जि. लातूर येथील मुख्याध्यापक गणेश राणबा सावळकर यांना लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.



यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक आ. विक्रम काळे, उपाध्यक्ष दयानंद सुरवशे,शिवकन्या महेंद्र गोडभरले, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड , सीईओ.राहुलकुमार मीना, एसपी. अमोल तांबे, शिक्षणाधिकारी विकास कुकडे,उत्तम माने,इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

गणेश राणबा सावळकर यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा येथे मुख्याध्यापक म्हणून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. आदर्श शिक्षक

पुरस्कार मिळाल्याबद्दल मा. आ.ज्ञानराज चौगुले, मा.आ.धर्माजी सोनकवडे, रेणापूर पंचायत समितीचे बीडीओ.सुमित जाधव, गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया, समस्त ककय्या महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष निवृत्ती सावळकर, उपक्रमशील शिक्षक जाकिर शेख, चर्मकार समाजाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सी.के.मुरळीकर,पत्रकार विठ्ठल कटके, ककय्या समाजाचे जिल्हाध्यक्ष श्रीमंत कावळे, पत्रकार अनिल सावळे, पतसंस्थेचे चेअरमन गोपाळ पडिले, संभाजी गुळवे, केंद्रप्रमुख गौतम टाकळीकर, जिल्हाध्यक्ष दिनेश कांबळे, संजय सोनकांबळे , शिरिष शेरखाने,रवी कुरील, बालाजी प्रभाकर कोकणे, दिगंबर खरटमोल, प्रा.महावीर कटके, त्र्यंबक राठोड, बालाजी सावळकर सर, नारायण राठोड, शहर युवक काँग्रेसचे मेघराज सावळकर, राम खरटमोल,आदींनी अभिनंदन केले.

## रितसर नोंदणी दस्तऐवजांद्वारे खरेदी केलेल्या जमिनीवर ताबा मिळविण्यासाठी धमकावणाऱ्यांवर कारवाई करा : विजय मस्के

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : आपण कायदेशीर मार्गाने रितसर दस्तऐवजांद्वारे खरेदी केलेल्या मौजे वरवंटी येथील गट क्रमांक ८५ मधील जमिनीवर अनधिकृतपणे

ताबा मिळविण्यासाठी आपल्याला धमकावणाऱ्यांवर मंडळींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विजय अशोकराव मस्के यांनी शुक्रवारी लातुरात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी त्यांनी सदरील जमिनीच्या नोंदणीकृत दस्तऐवजांच्या सत्यप्रतीही प्रसार माध्यमांपुढे सादर करून या प्रकरणी योग्य त्या न्याय निवाड्याची अपेक्षा व्यक्त केली.



लातूरमध्ये प्लॉट, जमिनीवर अनधिकृतरित्या ताबा मिळविण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे सांगून लातूर येथील राजा मणियार आणि त्यांच्या परिवारातील सदस्यांनी अशा प्रकारचे गैरकृत्य करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी माध्यमांसमोर केली होती. मणियार यांच्या मागणीसंदर्भात सत्य कथन करण्यासाठी विजय मस्के, सचिन देशमुख, गोपाळ लवटे यांनी सदरची जमीन रहेमतुल्ला नियमतुल्ला शेख, अजीम नियमतुल्ला शेख, बशीर नियमतुल्ला शेख यांच्याकडून दि. २७ जून २०२६ रोजी नोंदणीकृत दस्त क्रं . ६०९५/२०२६ अन्वये खरेदी केल्याचे पुरावेच माध्यमांसमोर प्रस्तुत केले. ही जमीन खरेदी केल्याच्या तारखेपासून आपल्याच कब्जात आहे. परंतु अब्दुल गफार अब्दुल रशीद मणियार यांनी ही जमीन खरेदी करण्यास मी इच्छुक असून तुम्ही ती खरेदी करू नका, माझी शेतजमीन लागून असलेल्या गट क्रं . ७७ पाखरसांगवी मध्ये आहे. मला सदरील जमीन घेऊन बार्शी मेनरोडला सलग जमीन करायची आहे, म्हणून ते धमकावत असल्याचा आरोपही विजय मस्के यांनी यांनी यावेळी केला.

या जमिनीची खरेदी केल्याचा राग मनात धरून मणियार यांनी आपल्याला व आपल्या सहकाऱ्यांना त्रास देण्याचा प्रयत्न चालविला आहे. आमच्या विरुद्ध एमआयडीसी पोलिसात खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही बाब आपण एमआयडीसी पोलिसांचाही निदर्शनास आणून दिली असून या जमिनीच्या खरेदीखताचे पुरावेही पोलीस प्रशासनापुढे सादर केले आहेत. आपण अनुसूचित जातीतून आलेलो असल्याने मणियार मला जाणीवपूर्वक त्रास देत आहेत. माझे शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसान करून माझी कब्जे वहिवाटीची जमीन बळकावण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप मस्के यांनी यावेळी केला. आपल्याला नाहक त्रास देणाऱ्या या मंडळींविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी,अशी मागणीही आपण पोलीस प्रशासनाकडे केल्याचे विजय मस्के यांनी सांगितले.

माजी नगरसेवक सचिन मस्के यांनी यावेळी आपले मत व्यक्त करताना या कारणासाठी आपल्या बंधूंनी, विजय मस्के यांनी आठ दिवस पोलिसांकडे चकरा मारल्या होत्या. पण पोलिसांनी त्यांच्याकडे लक्ष न देता दुसऱ्या मंडळींकडून राजकीय दबाव आल्याने आमच्यावरच गुन्हा दाखल केला असे सांगितले. जमीन बळकावण्याचे धंदे याच लोकांचे असून प्रशासनाने आमचीही कागदपत्रे बघावीत व त्यांचीही कागदपत्रे बघावीत असेही त्यांनी सांगितले. पोलीस प्रशासनाने गणेश चतुर्थीच्या बंदोबस्तासाठी आलेला ताफा या कामी आपल्या बंधूंवर अन्याय करण्यासाठी उपयोगात आणल्याचा आरोपही सचिन मस्के यांनी केला.

यावेळी विजय मस्के यांनी या जमिनीच्या खरेदीची कागदपत्रे, जमिनीचा नकाशा, धारण जमिनीची नोंदवही, फेरफार नोंदवहीच्या सत्यप्रतीही माध्यमांसमोर प्रस्तुत केल्या. या सगळ्या कागदपत्रांवरून कोण, कोणाची जमीन बळकावण्याचा प्रयत्न करत आहे, हे आता माध्यमांनीच आपल्याला सांगावे,अशी विनंती केली. यावेळी विष्णुपंत साठे, सचिन देशमुख, जाफर शेख यांचीही उपस्थिती होती.

# आ. तान्हाजी मुटकुळे कुटुंबियांनी दिल्लीत लावला आशीर्वादाचा दिवा

## पंतप्रधान नरेंद्र मोदीयांच्या २५ वर्षाच्या सेवापर्वानिमित्त आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ सप्टेंबर**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तसेच त्यांच्या २५ वर्षांच्या समर्पित आणि अखंड जनसेवेचा गौरव करण्यासाठी नवी दिल्ली येथे 'आशीर्वादाचा दिवा' हा विशेष उपक्रम उत्साहात पार पडला. राष्ट्रउभारणीचा ध्यास आणि 'विकसित भारत' या संकल्पाला नवी दिशा देणाऱ्या या कार्यक्रमात हिंगोली जिल्ह्याचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी आपल्या परिवारासमवेत दिल्ली येथे प्रत्यक्ष सहभागी होऊन पंतप्रधान मोदी यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली.

गुजरातचे मुख्यमंत्री ते देशाचे यशस्वी पंतप्रधान असा नरेंद्र मोदीजींचा गेल्या २५ वर्षांचा कार्यकाळ हा देशसेवा आणि गरीब कल्याणासाठी समर्पित राहिला आहे. या प्रदीर्घ सेवापर्वाचे स्मरण करत उपस्थितांनी दिव्यांची भव्य आरास केली आणि संपूर्ण परिसर दिव्यांच्या मंगलमय तेजाने उजळून निघाला.

या प्रसंगी भावना व्यक्त करताना आमदार तान्हाजीराव मुटकुळे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आणि त्यांची २५ वर्षांची समर्पित सेवा ही आपल्या सर्वांसाठी देशसेवेची नवी ऊर्जा देणारी आहे. 'विकसित भारत' घडवण्यासाठी त्यांनी घेतलेला ध्यास पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. हिंगोली जिल्ह्यातील तमाम जनतेच्या वतीने मी मोदींना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो. कार्यक्रमादरम्यान मुटकुळे परिवाराने प्रज्वलित केलेल्या 'आशीर्वादाच्या दिव्या'द्वारे राष्ट्राच्या प्रगतीचा संकल्प अधिक दृढ करण्यात आला.

हिंगोलीतही भारतीय जनता पक्षाच्यावतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या समर्पित आणि अखंडे जनसेवेचा गौरव करण्यासाठी आशीर्वादाचे दिवे लावण्यात आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच २०४७ मध्ये विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी संकल्प घेण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळे, शशीकांत वडकुते, ॲड के के शिंदे, सरचिटणीस उमेश नागरे, कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, ॲड अमोल जाधव, अमित रूहीटीया, बाबा घुगे, नरेश अग्रवाल, विलास गोरे, आशिष जैस्वाल, संजय खंडेलवाल, रजनी पाटील, क्रिष्णा रूहीटीया यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नर्सी ११ केव्ही उपकेंद्राचा चौकशी अहवाल वरिष्ठांना सादर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ सप्टेंबर**

नरसी नामदेव येथील ३३ केव्ही उपकेंद्रावर अतिरिक्त विद्युत भार कमी करण्यासाठी प्रस्तावित उच्चदाब वाहिनी व ११ केव्ही फिडरच्या कामा मध्ये झालेल्या घोटाळ्या संदर्भात विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलने उपस्थित केलेल्या मागणीची महावितरण प्रशासनाने दखल घेतली आहे. या प्रकरनात नांदेड परिमंडळाचे मुख्य अभियंता राजाराम माने, एजीएम सातपुते यांच्यासोबत नांदेड येथील कार्यालयात दि. १५.०९.२०२६ रोजी सविस्तर चर्चा झाल्यानंतर दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात येणारे सामूहिक आत्मदहन आंदोलन दि. ०२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत तात्पुरता स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

नरसी नामदेव येथील वीज यंत्रणेवरील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी उच्चदाब वाहिनी व ११ केव्ही फिडरचे काम मंजूर करण्यात आले होते. मात्र, अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण झाले नसतानाही देयक अदा करून शासनाचे आर्थिक नुकसान करून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आला होता त्या संदर्भात विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलचे संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल यांनी संबंधित प्रकरणाच्या चौकशीची करून सर्व दोषीन विरुद्ध कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती.

महावितरणच्या मुख्य अभियंता कार्यालयाकडून दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी देण्यात आलेल्या पत्रानुसार या प्रकरणाचा समिती अहवाल प्राप्त झाला असून पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्य अभियंता राजाराम माने यांच्यासोबत झालेल्या चर्चेत प्रकरणाची पुढील कार्यवाही व चौकशी बाबत माहिती देण्यात आली.

चर्चेवेळी संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल, संचालक नौमान शेख नईम, जिल्हाध्यक्ष शेख बासिद, शहराध्यक्ष पठाण साजिद खान, शहर सेक्रेटरी पठान माज खान तसेच युवा कार्यकर्ता मुद्दासिर शेख उपस्थित होते.

महावितरण प्रशासनाकडून चौकशी व पुढील कार्यवाही सुरू असल्याने आंदोलनाचा दि ०२ ऑक्टोबर २०२६ रोजी पर्यंत तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तरी संबंधित सर्व दोषी अधिकारी कर्मचारी आणि ठेकेदार सर्वांविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याची मागणी विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलकडून कायम ठेवण्यात आली आहे.

# औंढयात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दिपोत्सव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ सप्टेंबर**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त औंढा नागनाथ येथील आठवे ज्योतिर्लिंग श्री नागनाथ मंदिरात ७ हजार ५१ दिव्याचा दिपोत्सव साजरा करण्यात आला. भारतीय जनता पार्टीचे औंढा नागनाथ शहराध्यक्ष बबन सोनुने यांनी नागनाथ मंदिरात दिपोत्सवाचे आयोजन केले होते. तर दत्त मंदिरात गणेश देशमुख व पोळा मारोती मंदिरात माजी नगराध्यक्ष दिपाली पाटील यांनी दिपोत्सव कार्यक्रम घेतला.

यावेळी श्रीदत्त मठाचे महंत शाम गिरीजी महाराज, माजी नगराध्यक्ष दिपाली पाटील, नगरसेविका अश्विनी पाटील, मा.नगरसेवक गणेश देशमुख, विलास काळे, गणेश पाटील, ॲड एस एस कदम, शंकर काळे, प्रा गजानन कुटे, हरिहर भोपी, तुळजादास भोपी, कृष्णा ऋषी, ॲड गणेश ठाकूर, राजेश गिरी, राज लाटे, अनिल भांडे, नवनाथ देशमुख, प्रशांत स्वामी, महेश जोशी, विजय ठाकूर, अभिजीत लोखंडे, बसवेश्वर स्वामी, शिवकुमार स्वामी, मुकेश पडोळे, गजानन पाठक, डिंगाबर सोनूने, सुनील भांडे, नागेश माने, मंगेश गुरव यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.



**हिंगोली– शुक्रवारी घरोघरी महालक्ष्मी सणानिमित्त महालक्ष्मी मांडण्यात आल्या. यावेळी महालक्ष्मीची विधीवत पूजा, आरती करून सुंदर सजवण्यात आले. यावेळी सुंदर देखावे तयार करण्यात आल्यामुळे महालक्ष्मीचा सण अधिकच आनंद आणि उत्साह निर्माण करीत होता. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची भेट



हिंगोली– औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे गोजेगाव येथील कमलाबाई सोपान कांदे (वय ६०) यांच्या आत्महत्येनंतर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन कुटुंबाची परिस्थिती जाणून घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांचे सांत्वन केले. कमलाबाई कांदे यांच्या नावे स्वतंत्र शेतजमीन नसून शेती त्यांच्या पती सोपान विठोबा कांदे यांच्या नावे आहे. गोजेगाव येथील गट क्रमांक २२/२ (वर्ग–२) ही जमीन सामाईक खात्यावर असून त्यामध्ये सोपान विठोबा कांदे, दत्ता विठोबा कांदे व उद्धव विठोबा कांदे यांचा समावेश आहे. कमलाबाई कांदे यांच्या पश्चात पती सोपान विठोबा कांदे, मुलगा विष्णू सोपान कांदे व सून असा परिवार आहे. पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करून त्यांना धीर दिला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

### औद्योगिक विकासाला चालना देणाऱ्या उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य– पालकमंत्री




हिंगोली–हिंगोलीच्या औद्योगिक विकासाला चालना देणाऱ्या सकारात्मक उपक्रमांना सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले. हिंगोली एमआयडीसी येथे प्लास्टिक पॅरालिसिस ऑईल फॅक्टरीचे लोकार्पण पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते (ता.१६) रोजी झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, सतीश टापरे आदी उपस्थित होते. प्लास्टिक कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्याच्या दृष्टीने अशा प्रकल्पांना महत्त्व आहे. स्थानिक पातळीवर उद्योगांना चालना मिळाल्यास रोजगाराच्या संधी निर्माण होतील. तसेच औद्योगिक विकासाला गती मिळण्यास मदत होईल, असे पालकमंत्री झिरवाळ यांनी सांगितले. यावेळी त्यांनी उद्योजक, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांशी संवाद साधला. प्रकल्पाची कार्यपद्धती आणि कामकाजाची माहिती जाणून घेतली. तसेच प्रकल्पाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ठिकठिकाणी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ सप्टेंबर**

जिल्ह्यात ठिकठिकाणी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहनानंतर अनेक ठिकाणी सामाजिक व सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला सलामी देऊन अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर आकर्षक रांगोळीने सजविण्यात आला होता. मराठवाड्याच्या स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्मे आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण यावेळी करण्यात आले. या ध्वज वंदन कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, जिल्हा पुरवठा अधिकारी आप्पासाहेब पाटील, तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ, कोळसा येथे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपर वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष भास्करराव रामराव बेंगाळ यांच्या हस्ते ध्वजारोहणाने करण्यात आली. ध्वजारोहणानंतर देशभक्तीपर गितांनी परिसर भारावून गेला. संस्थेच्या वतीने सेवानिवृत्त झालेल्या मान्यवरांचा सेवापूर्तीबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी गव्हाणे पि. के. शिक्षण विस्तार अधिकारी, पायघण डी. आर. केंद्रप्रमुख, पिनगाळे टि. व्ही.शाखा अभियंता, नांदेड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सचिव अंकुशराव बेंगाळ, उपाध्यक्षा सौ. आनंदीताई बेंगाळ, प्राचार्य अभिषेक बेंगाळ, मुख्याध्यापक शिंदे आर. बी., मुख्याध्यापक सरकटे व्ही. एम., पर्यवेक्षक कसाब पी. पी., चोपडे, केशवराव कापसे, पांडुरंग मोहिते, प्रितेश शिंदे, भोपाळे आदी उपस्थित होते.

येथील आदर्श महाविद्यालयाच्या प्रांगणात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा, प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष गणेशप्रसाद चौधरी, संस्था सदस्य मोहम्मद सलीम अब्दुल सत्तार, विजयकुमार काबरा, आदर्श प्राचार्य प्रो. डॉ.विलास आघाव, उपप्राचार्य प्रो.डॉ. संजयकुमार नरवाडे, माजी एनसीसी अधिकारी मेजर पंढरीनाथ घुगे महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व छात्रसैनिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा .डॉ. शैला वाघ यांनी केले. संस्थाध्यक्ष यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या व एनसीसी अधिकारी समवेत एनसीसी परेडचे निरीक्षण केले व राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी याप्रसंगी उत्कृष्ट परेड सादर केली. राष्ट्रीय ध्वजारोहण समारंभासाठी आदर्श महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

वसमत तालुक्यातील कोनाथा येथील जिल्हा परिषद शाळेतही मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

# हट्टा पोलिस ठाण्याच्या जागेवरील बांधकामास न्यायालयाची मनाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ सप्टेंबर**

जिल्ह्यातील हट्टा पोलिस ठाण्याच्या जागेत मागील अनेक वर्षापासून अतिक्रमण करून त्यावर बांधकाम करण्यात येत होते. यासंदर्भात हट्टा येथील गावकऱ्यांनी न्यायालयात जनहीत याचिका सादर केली होती. या याचिकेवर नुकतीच सुनावणी पार पडली असून न्यायालयाने अतिक्रमण धारकाविरोधात मनाई हुकुम आदेशित केला असून याठिकाणी होत असलेले बांधकाम बंद करण्याचे आदेश दिले आहेत. सदरील आदेशाची अंमलबजावणी करावी अशी मागणी सखाराम डोळस यांनी पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा यांचेकडे केली आहे.

याबाबत निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, हट्टा येथील सर्व्हे क्रमांक ७८ गट क्रमांक ३६९ मधील ३४ आर शेत जमीन तत्कालीन जिल्हाधिकारी परभणी यांचे आदेशाने संपादीत करण्यात आली. सन १९५४ साली संपादीत केलेल्या या जमिनीबद्दल भूमी अभिलेख कार्यालय कमी जास्त पत्रक तयार करण्यात आला. सदर गट क्रमांकाच्या सातबारा अभिलेखातून सन १९५४ साली ३४ गुंठे कमी करण्यात आली. यानंतर या जागेवर हट्टा येथील रावणबापू देशमुख यांनी बेकायदेशीर बांधकाम करीत असल्याबाबत तसेच सदरील काम त्वरीत बंद करून झालेले बांधकाम पाडण्यात यावे अशी मागणी तक्रारदार सखाराम डोळस यांनी संबंधितांकडे वारंवार केली. परंतु कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. अखेर हट्टा येथील सखाराम डोळस आणि गावातील काही नागरिकांनी वसमत न्यायालयात जनहीत याचिका दाखल केली. याप्रकरणी न्यायालयात सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने दि ८ सप्टेंबर २०२६ रोजी रावणबापू देशमुख यांच्याविरूध्द मनाई हुकुम आदेश पारीत करून याठिकाणी होत असलेले बांधकाम बंद करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशानंतर तक्रारदार सखाराम डोळस व गावातील काही मंडळींनी पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा यांची भेट घेत संबंधीत पोलिस ठाण्याची जागा ताब्यात घेवून त्याला तार फेन्सिंग करण्याची मागणी केली आहे.

# कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची पालकमंत्र्यांकडे शेतकऱ्यांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ सप्टेंबर**

मराठवाड्यात दुष्काळाच्या झळा तीव्र होत असताना नांदापूर मंडळातील शेतकऱ्यांनी दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांची भेट घेत निवेदन सादर केले.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पालकमंत्री झिरवाळ हे दौऱ्यावर असताना परिसरातील शेतकऱ्यांनी त्यांना गराडा घालत आपल्या विविध समस्या व व्यथा मांडल्या.

नांदापूर मंडळातील अनेक भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेतीपिकांवर मोठा परिणाम झाला असून शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे यावेळी शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे नांदापूर मंडळाचा दुष्काळग्रस्त भागात समावेश करून शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. यावेळी परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी पालकमंत्र्यांसमोर आपल्या अडचणी मांडत शासनाने तातडीने मदतीची भूमिका घ्यावी, अशी मागणी केली.

शेतकऱ्यांच्या मागण्या व परिस्थितीची दखल घेत पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन नांदापूर मंडळातील शेतकऱ्यांसाठी दुष्काळाबाबत शासनस्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

त्या ठिकाणी नांदापूर व नांदापूर मंडळ परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते

# पीक कर्जासाठी बँकेला टाळे ठोकण्याचा इशारा

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १८ सप्टेंबर -**

कर्जमाफीस पात्र असूनही केवळ संबंधित गाव बँकेच्या दत्तक गावांच्या यादीत नसल्याचे कारण पुढे करून अनेक वर्षांपासून बँकेकडून पीककर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना नव्याने पीककर्ज देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप करत शिवसेना ठाकरे उपजिल्हाप्रमुख उपजिल्हाप्रमुख म हेश पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. संबंधित शेतकऱ्यांना तातडीने पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अन्यथा स्टेट बँक ऑफ इंडिया देगलूर शाखेला २१ सप्टेंबर रोजी बँकेला टाळे ठोकून तीव्र निदर्शने आंदोलन करण्यात येईल,असा इशारा त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया, देगलूर शाखेच्या शाखाधिकाऱ्यांना दिला आहे.

याबाबत अधिक शिवसेनेचे ,,जवाब दो हे आंदोलन आक्रमक भूमिका घेत यशस्वीरित्या पार पडले होते.आत्ता पुन्हा शिवसेना स्टाईल मध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या शाखाधिकाऱ्यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. २०२६ च्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत



कर्जमाफीस पात्र असलेल्या, तसेच अनेक वर्षांपासून संबंधित बँकेतून पीककर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ त्यांचे गाव बँकेचे दत्तक गाव नसल्याने नवीन पीककर्ज नाकारले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

आधीच पावसाच्या खंडामुळे खरीप हंगामातील पिके वाळून जाऊन कोराडा दुष्काळ पडला असून शेतकरी न भुतो न भविष्यते अशी बिकट आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत पीककर्जाचा आधार नाकारला जात असल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक तसेच मानसिक ताण वाढत असल्याचे महेश पाटील यांनी म्हटले आहे.कर्ज माफीस पात्र असलेल्या आणि अनेक वर्षांपासून बँकेशी व्यवहार करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ गाव दत्तक नसल्याचे कारण देऊन पीककर्जापासून वंचित ठेवू नये. पात्र शेतकऱ्यांना तातडीने पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, या मागणीची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही न झाल्यास २१ सप्टेंबर रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया, देगलूर शाखेसमोर टाळे ठोकून निदर्शने करण्यात येतील आणि आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा स्पष्ट इशारा शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर, शिवसेना देगलूर शहर प्रमुख भगवान जाधव, शिवसेना शहर संघटक मष्णाजी पैलावार, युवा सेना शहर समन्वयक संतोष कांबळे, तमलूरचे सरपंच संतोष मांडे, वन्नाळी येथील माजी सरपंच रमेश पाटील वन्नाळीकर, वन्नाळीचे से.स.सोसायटीचे चेअरमन यशवंत पाटील, शेळगावचे युवा कार्यकर्ते बालाजी पारसेवार, लख्खा चे शिवसेना शाखाप्रमुख शेंबाळे आदींची उपस्थितीत होते.

# मुदखेड शहरातील हुतात्मा स्मारकासह विविध ठिकाणी ध्वजारोहण स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १८ सप्टेंबर -**

मुदखेड शहरात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शहरातील हुतात्मा स्मारक, तहसील कार्यालय, नगर परिषद, पोलिस स्टेशन, काँग्रेस कमिटी कार्यालय तसेच विविध शाळा व विद्यालयांम ध्ये ध्वजारोहणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

मुदखेड शहरातील हुतात्मा स्मारक येथे उपनगराध्यक्ष इम्रान सेठ मच्छीवाले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी शुभम वाटोरे व उपस्थित मान्यवर व कर्मचाऱ्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतींना अभिवादन केले. तहसील कार्यालयात तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला.

मुदखेड नगर परिषदेतही नगराध्यक्षा सौ. विश्रांती माधव कदम यांच्या हस्ते मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. म ुदखेड पोलिस ठाण्यात पोलीस निरीक्षक वागतकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक राठोड मॅडम, पोलीस उपनिरीक्षक सुरेश जाधव,पोलीस उपनिरीक्षक सरोदे, यांनी ध्वजारोहण करून अभिवादन केले.

तसेच काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस कार्यालयात ध्वजारोहण करून काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मुक्तिसंग्रामातील हुतात्मे आणि स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी केलेल्या संघर्षाची आठवण करून देणारा हा दिवस मुदखेड शहरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमांम ुळे शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

## हाणेगाव येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा

**हाणेगाव** -हाणेगाव येथील ग्रामपंचायत कार्यालय,जिल्हा परिषद शाळा,कन्याशाळा,हुतात्मा स्मारकात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त हुतात्मा स्मारक येथे स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. म राठवाड्याच्या मुक्तीसाठी तत्कालीन हैदराबाद संस्थानाविरुद्ध लढा देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण यावेळी करण्यात आले. हुतात्मा स्मारक येथे उपस्थित मान्यवर व नागरिकांनी पुष्प अर्पण करून हुतात्म्यांना आदरांजली वाहिली यावेळी ग्रामपंचायत प्रशासक बालाजी उमाटे यांना हुतात्मा स्मारकाचे स्वच्छता व विकासासाठी ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देण्यात आले.यावेळी ग्रामविकास अधिकारी अमोल जाधव,हज्जु सेठ चमकुडे,योगेश देशमुख, दिलीप बंदखडके,मुजीपोदीन चमकुडे,वसंत आडेकर, मुक्तार पटेल,यादव सुर्यवंशी, मुनीर कोटग्याळे,युवराज स्वंतकर,किशोर आडेकर, दिलीप वाडीयार,रामदास बैलवाड,सचीन भंडारे,कोंडीबा शेरीकार,सिद्धू पटणे,बाबु साधु व ग्रामस्थ, विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

**हदगाव** -मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिन हुतात्मा स्मारक नांदेड रोड, हदगाव येथे स्वतंत्र सैनिकांना अभिवादन करत शासनाच्या निदर्शनाचे पालन करत ध्वजारोहणाचा कार्यक्रम नगर परिषद, हदगाव चे मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांच्या हस्ते उत्साहाच्या वातावरणात पार पडले. यावेळेस व्यसनमुक्तीची शपथ देखील उपस्थित त्यांना देण्यात आली. मराठवाड्याच्या मुक्तीसाठी तत्कालीन हैदराबाद संस्थानविरोध लढा देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाचे स्मरण यावेळी करण्यात आले. हुतात्मा स्मारक येथे उपस्थित मान्यवर व नागरिकांनी पुष्प अर्पण करून हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. यावेळी नगराध्यक्ष रोहिणीताई वानखेडे, युवा नेते भास्करदादा वानखेडे, सतीश देशमुख, कर निर्धारण अधिकारी प्रवीण मंगनाळे, लेखापाल रवींद्र डेंगळे, पाणीपुरवठा अभियंता गोविंद सिरसाट, विद्युत अभियंता प्रशांत डोईजड, पी एम ए वाय अभियंता प्रसाद कदम, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सखाराम बोरकर, शहर सम न्वयक प्रणाली मुजमुले, गोविंद नागरगोजे, लिपिक शेख अजीम, रम ेश चव्हाण यांच्यासह नगरसेवक, नागरिक व नगर परिषदेचे कर्मचारी बांधव उपस्थित होते.

## संभाजी व्यवहारे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती

**नवीन नांदेड** -नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस



उपनिरीक्षक म्हणून कर्तव्य बजावत असलेल्या संभाजीराव शेषराव व्यवहारे बोरीकर यांची नुकतीच पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती झाली. संभाजी व्यवहारे बोरीकर यांची पोलीस उप निरीक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे वरीष्ठ पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, तसेच सहकारी कर्मचारी, पत्रकार बांधवांसह नातेवाईक तथा सर्व मित्रमंडळींकडून व्यवहारे यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## रत्नाकर महाबळे यांना सुजात आंबेडकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण !

**लोहा** -येथील पत्रकार रत्नाकर महामंडळ यांना कॉम्रेड अनंतराव नागापूरकर यांच्या स्मरणात देण्यात येणारा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांच्या हस्ते



नुकत्याच नांदेड येथील कुसुम सभागृहात भरगच्च कार्यक्रमात मोमेंटो, प्रशस्तीपत्र देऊन प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ प्रवीण पाटील, प्रमुख पाहुणे दैनिक प्रजावणीचे संपादक शंतनू डोईफोडे, वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते फारूक अहमद, महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेता प्रशांत इंगोले, कॉम्रेड अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप नागापूरकर, दैनिक सांजवार्ताचे उपसंपादक अविनाश पाटील, प्रतिष्ठानचे सचिव राज गोडबोले,यांची उपस्थिती होती यात जिवण गौरव पुरस्कार सचखंड गुरुद्वारा नांदेड चे माजी अध्यक्ष लड्डूसिंह महाराज व कीनवट चे माजी नगराध्यक्ष इसादखान यांना देण्यात आला.या बहारदार कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचलन साहित्यिक, पत्रकार राम तरटे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रतिष्ठानचे सचिव राज गोडबोले यांनी मानले.

## अतिक्रमण विभागाचे पथक प्रमुख दत्ता कल्याणकर पुरस्काराने सन्मानित

**नांदेड**-नांदेड शहरातील अतिक्रमणांविरोधात सातत्यपूर्ण आणि प्रभावी कारवाई करत कर्तव्य बजावणारे अतिक्रमण विभागाचे पथक प्रमुख दत्ता कल्याणकर यांना ऑगस्ट २०२६ चा Employee Of The Month पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला असून,त्यांच्या कार्याचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.अतिक्रमण विभागात पथक प्रमुख म्हणून पदस्थापना झाल्यापासून दत्ता कल्याणकर यांनी शहरातील सार्वजनिक रस्ते, चौक,फुटपाथ तसेच नागरिकांच्या वापरातील सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणांविरोधात सातत्याने कारवाई केली. अतिक्रमणामुळे निर्माण होणाऱ्या वाहतुकीच्या समस्या तसेच नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी त्यांनी विभागाच्या पथकासोबत नियोजनबद्ध पद्धतीने कारवाईवर भर दिला.

## जिल्हा परिषदेत महेश पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला सलामी देऊन अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

## सिडकोत मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ठिकठिकाणी ध्वजारोहण

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १८ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त सिडको कार्यालय, म नपा क्षेत्रीय कार्यालयासह सिडको परिसरातील शाळा, महाविद्यालय व ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी महाराष्ट्र गीत व मराठवाडा मुक्तीसंग्राम गीतांचे स्मरण करून मोठ्या उत्साहात ध्वजारोहण करण्यात आला.

सिडको येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त मराठवाड्याच्या मुक्तीसंग्रामाचा गौरवशाली इतिहास आणि हुतात्म्यांचे बलिदान सदैव प्रेरणा देणारा दिवस आहे. या संग्रामातील बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना अभिवादन करून सिडकोचे मनापा क्षेत्रीय कार्यालय येथे सकाळी ७ वाजता मनापाचे उपयुक्त गंगाधर इरलोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा फरहतउल्ला बेग यांच्यासह वसुली पर्यवेक्षक नारायण आठवले, वसंत कल्याणकर, संजय नागापूरकर यांच्यासह क्षेत्रीय कार्यालयातील व मातृसेवा आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी यांची उपस्थिती होती . तसेच सिडको कार्यालय येथे सहाय्यक विकास अधिकारी कपिल राजपूत यांच्या हस्ते सकाळी ठीक ७:३५ वाजता ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी लेखा सहाय्यक संकेत गिरी यांच्यासह सुरक्षा रक्षक सौ.लता पोहरे, साईनाथ गिरी, राज धुमाळ, केंद्रे, बोगदरे यांच्यासह ज्येष्ठ नागरिक यांची उपस्थिती होती. तर सिडको परिसरातील सर्व शाळा, महाविद्यालय व ग्राम पंचायत मोठ्या उत्साहात महाराष्ट्र गीत व मराठवाडा मुक्ती संग्राम गीत गाऊन विद्यार्थ्यांनी उत्साहात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला.

# राष्ट्रीय जलदिनाच्या मागणीस सुजात आंबेडकर यांचा पाठिंबा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ सप्टेंबर -**

राष्ट्रीय जलदिनाच्या चळवळी संदर्भात आंदोलनाचे प्रणेते महेंद्र पिंपळगावकर यांनी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी सुजातदादांनी सदर मागणीस आपला जाहीर पाठिंबा असल्याचे सांगितले. पिंपळगावकर यांच्यासह महानगरपालिका गटनेते प्रशांत इंगोले, भगवान गायकवाड, किशोर अटकोरे आदी उपस्थित होते.

महाड चवदार तळ्याच्या पाण्याच्या सत्याग्रहाचे हे शताब्दी वर्ष असून २० मार्च राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित करावा अशी मागणी या आंदोलनाचे प्रणेते महेंद्र पिंपळगावकर यांनी म ागील अनेक वर्षापासून लावून धरली आहे. त्याच पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते तथा युथ आयकॉन सुजात आंबेडकर हे नांदेड



दौर्यावर आले असता त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधत राष्ट्रीय जलदिनाच्या मागणीचे पत्रक त्यांना दिले. यावर त्यांनी ही मागणी रास्त असून त्यास आपला पाठिंबा असल्याचे सांगितले.

महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे हे शताब्दी वर्ष असून २० मार्च हा दिवस राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित करावा अशी मागणी राज्य व केंद्रस्तरावर मागील तीन वर्षापासून सातत्याने करण्यात येत आहे. राष्ट्रपतींना याबाबत निवेदन पाठविण्यात आले आहे. तसेच राजकारणातील दिग्गज नेते खा. शरद पवार, खा. असदुद्दीन ओवेसी, केंद्रीय मंत्री चिराग पासवान, खा.प्रा. ज्योतीताई वाघमारे, वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या अंजलीताई आंबेडकर, भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर, रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर तसेच राज्यातील वेगवेगळ्या खात्याचे मंत्री तथा वरिष्ठ सनदी अधिकार्यांच्या भेटी घेऊन राष्ट्रीय जलदिनाची मागणी करण्यात आली. तसेच विविध सभा, संमेलने, धम्म परिषदा आदी वेगवेगळ्या स्तरावर राष्ट्रीय जलदिनाच्या मागणीचा ठराव घेण्यात येत आहे. समाजाच्या सर्वच स्तरातून या मागणीस मोठा पाठिंबा मिळत असल्याचे या आंदोलनाचे प्रणेते महेंद्र पिंपळगावकर यांनी सांगितले.

## स्व. गणेश गुड्डा यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १८ सप्टेंबर -**

येथील जय महाराष्ट्र गणेश मंडळाच्या वतीने आदर्श शिक्षक स्वर्गीय गणेश भागवत गुड्डा यांच्या स्मरणार्थ रविवार, २० सप्टेंबर २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या सामाजिक उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



जय महाराष्ट्र गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. याच सामाजिक बांधिलकीतून नुकतेच अपघाती निधन झालेले विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील आदर्श शिक्षक तथा एनसीसी विभाग प्रमुख स्व. गणेश भागवत गुड्डा यांच्या स्मरणार्थ यंदा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . रक्तदान हे श्रेष्ठ दान असून, आपल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णाला जीवनदान मिळू शकते. त्यामुळे नागरिकांनी कोणताही संकोच न करता या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष बाळा देशमुख, उपाध्यक्ष आदित्य चौधरी, सचिव भाग्यराज माने, चिकू भावसार तसेच मार्गदर्शक सुमित जयस्वाल यांनी केले आहे. स्व. गणेश गुड्डा हे विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात एनसीसी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते.

# श्री संत सेवादास गणेश मंडळाचा उपक्रम; भाविकांना भोजनाची सुविधा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १८ सप्टेंबर -**

शहरातील चुंगी नाका, गोकुंदा रोड परिसरात गेल्या २८ वर्षांपासून सातत्याने श्री सेवादास गणेश मंडळातर्फे गणरायाची स्थापना मोठ्या उत्साहात करण्यात येते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या या मंडळाने मागील चार वर्षांपासून ग्रामीण भागातून गणेशदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी दररोज भंडाऱ्याचे आयोजन करून अन्नदानाची अनोखी परंपरा सुरू ठेवली आहे.



किनवट शहरात गणेशदर्शनासाठी तालुक्यातील ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक येतात. त्यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील भाविकांचाही समावेश असतो. शहरातील हॉटेलमध्ये भोजन करण्याचा खर्च अनेकांना परवडत नसल्याची बाब लक्षात घेऊन अभय महाजन मित्रपरिवाराने भाविकांसाठी दररोज भोजनाची व्यवस्था केली आहे.

या भंडाऱ्यामध्ये दररोज सुमारे अडीच क्विंटल तांदळाचा वापर करून वरण-भात आणि बुंदीचा प्रसाद तयार केला जातो. सकाळपासून सुरू होणाऱ्या या अन्नदानाचा लाभ गणेशदर्शनासाठी येणारे भाविक मोठ्या संख्येने घेत आहेत.

गणेशोत्सवाच्या उत्साहात भक्तांना भोजनाची सुविधा उपलब्ध करून देत सेवादास गणेश मंडळ आणि अभय महाजन मित्रपरिवाराने सामाजिक बांधिलकी जपली आहे. मंडळाच्या या उपक्रमाचे भाविकांकडून समाधान व्यक्त होत असून गणेशोत्सवात भक्तीबरोबरच सेवाभावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## धर्माबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध जुगार अड्यावर कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ सप्टेंबर -**

धर्माबाद पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने धर्माबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करुन पाच आरोपींना अटक केली असून, ८१ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई दि.१६ सप्टेंबर रोजी करण्यात आली.

धर्माबाद शहरातील चुंगी नाका येथे ऑनलाईन राजश्री लॉटरी नावाचा जुगार खेळण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने याठिकाणी जावून कारवाई केली असता याठिकाणी म ोहंमद असिफ मोहंमद अन्वर रा.सरस्वतीनगर धर्माबाद, संतोष नागोजी पबतवार रा.बाळापूर, साईनाथ उर्फ अंजू बालेमवार रा.देवगल्ली हे तिघे जुगार खेळताना आढळून आले. त्यांच्याकडून संगणक साहित्य, रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण ७० हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यांच्याविरुध्द धम ार्बाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर शहरातील रामनगर परिसरात कल्याण नाईट नावाच्या मटक्यावर धर्माबाद पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली. या कारवाईत अजय उर्फ राजू गाजेवार रा.सहारा कॉलनी व शेख सज्जू रा.बिलोली या दोघांना ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी ११ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

## अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ सप्टेंबर -**

अवैध रेतीची वाहतूक करणार्या दोन जणांना लोहा पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून २५ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

लोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारेगाव ते खडकमांजरी या मार्गावर अवैधरित्या रेतीची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन लोहा पोलिसांनी या मार्गावर चालणार्या एमएच-२६-सीएच-६३५८ या वाहनाची तपासणी केली असता यामध्ये पाच ब्रास रेती आढळून आली. पोलिसांनी टाटा हायवा व रेती असा एकूण २५ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत पोलिसांनी सचिन जानकीराम दिघे रा.कारेगाव, गौरव गौतम आढाव रा.लोहा यांना अटक केली असून त्यांच्याविरुध्द लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलीस निरीक्षक घोडके, पोलीस उपनिरीक्षक शेख, पोलीस अंमलदार क्षीरसागर, खंडू घोरबांड यांच्या पथकाने पार पाडली.

## देगलूर पोलिसांची जुगार अड्यावर कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ सप्टेंबर -**

देगलूर पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापा मारुन जुगार अड्यावर कारवाई केली. या कारवाईत तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले असून, ४६ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

देगलूर शहरातील प्रिन्स हॉटेलसमोर कल्याण नावाचा मटका खेळणार्या रविंद्र रघुनाथ कांबळे रा.गौतमनगर व शेख साबेर शेख खालीद रा.बिचकुंदा या दोघांना अटक केली. त्यांच्याकडून दोन मोबाईल, रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण ३० हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला तर दुसर्या कारवाईत देगलूर बसस्थानक परिसरात छापा मारुन कल्याण नावाचा मटका खेळणार्या सतीश नागोराव ढगे यास अटक केली आहे. त्याच्याकडून मोबाईल, रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण १५ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हि कारवाई परिक्षाधीन पोलीस उपअधीक्षक वैभव पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार केंद्रे, वाघम ारे, मधुकर नामपल्ले व विशाल अटकोरे यांच्या पथकाने केली.

# साहेब कुठे? शेतकरी मात्र महावितरणच्या दारात!

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १८ सप्टेंबर -**

शेतकऱ्यांच्या शेतात वीज पोहोचविण्याची जबाबदारी असलेल्या महावितरणच्या इस्लापूर कार्यालयातील सहाय्यक अभियंत्यांच्या कार्यपद्धतीबाबत शेतकरी व वीजग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. समस्या घेऊन शेतकरी कार्यालयात येतात; मात्र अधिकारी भेटत नसल्याच्या तक्रारी असल्याने साहेब नेमके कुठे असतात? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

इस्लापूर परिसरातील शेतकऱ्यांना



शेतीपंपाचा वीजपुरवठा, वीज खंडित होणे, रोहित्रातील बिघाड, कमी-अधिक दाब, नवीन वीज जोडणी अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्या घेऊन शेतकरी महावितरण कार्यालयात धाव घेतात. मात्र सहाय्यक अभियंता संदीप राठोड यांची भेट होत नसल्याची तक्रार काही शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे एकाच कामासाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या मारण्याची वेळ येत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

अधिकाऱ्यांशी संपर्क साधायचा म्हटले तर भ्रमणध्वनी कधी बंद, तर कधी संपर्क क्षेत्राबाहेर; आणि संपर्क झाला तरी बघतो, करू एवढेच उत्तर! त्यामुळे तक्रारींचे पुढे काय झाले, त्यावर कार्यवाही कधी होणार, याचे उत्तर शेतकऱ्यांना मिळत नसल्याची नाराजी आहे.

महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे ही शेतकऱ्यांची हौस नसून त्यांच्या शेतीशी निगडित गरज आहे. वीजपुरवठ्यातील छोटीशी अडचणही शेतकऱ्याच्या पिकावर परिणाम करू शकते. अशा परिस्थितीत जबाबदार अधिकारी उपलब्ध नसल्याच्या तक्रारी गंभीरपणे घेण्याची गरज आहे.

दरम्यान, सहाय्यक अभियंता कार्यालयीन वेळेत नेमके कुठे असतात, कार्यालयात त्यांची नियमित उपलब्धता किती असते आणि शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचे किती प्रम ाणात निराकरण झाले आहे, याची महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना निर्माण होऊ नये, यासाठी महावितरणने इस्लापूर कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेऊन नागरिकांना अधिकारी सहज उपलब्ध होतील, अशी व्यवस्था करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या संदर्भात सहाय्यक अभियंता संदीप राठोड यांची बाजू जाणून घेण्यासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांचा खुलासा किंवा अधिकृत प्रतिक्रिया प्राप्त झाली नाही.